cmyk

## संपादकीय

### जग विनाशाकडे यूनो मात्र गोंधळातच

जगात विविध देशांमध्ये सध्या लष्करी संघर्ष तीव्रपणे सुरू असताना युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघ या नावाने ओळखली जाणारी जागतिक संघटना नक्की काय करत आहे याबाबत शंका घेण्यास वाव आहे. जागतिक पातळीवर शांतता राहावी म्हणून स्थापन करण्यात आलेल्या यूनोला जागतिक संघर्षामध्ये कोणतीच भूमिका घेता येत नाही हे पुन्हा एकदा सिद्ध होत आहे. दुसऱ्या महायुद्धामध्ये आण्विक युद्धामुळे जी प्रचंड प्राणहानी झाली,

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### व्याजदरात कपात ; एसबीआयकडून मिळणार स्वस्त कर्ज

मुंबईः देशातील सर्वात मोठी सरकारी बँक स्टेट बँक ऑफ इंडियाने त्यांच्या कर्जावरील व्याजदर ५० बेसिस पॉइंटने कमी केले आहेत. यामुळे या बँकेचे कर्ज घेतलेले विद्यमान कर्जदार आणि नवीन कर्जदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच यामुळे एसबीआयकडून कर्ज घेणे आता स्वस्त होईल. या नवीन बदलामुळे एसबीआयचा रेपो लिंक्ड लेंडिंग रेट आता ७.७५ टक्के झाला आहे, तर त्याचा एक्स्टर्नल बेंचमार्क आधारित लेंडिंग रेट ८.६५ टक्क्यांवरून ८.१५ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. आरएलएलआर हा भारतीय रिझर्व्ह बँकेच्या रेपो दराशी निगडित एक्स्टर्नल बेंचमार्क आहे. आरबीआयने रेपो दरात बदल केल्यास या दरातही बदल केला जातो. हे दोन्ही बदल १५ जून २०२५ पासून लागू राहतील.

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–५४ | मंगळवार, दि.१७ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### ..तर शाखाध्यक्ष, विभागाध्यक्ष बदला– राज ठाकरे

मुंबई–शाखाध्यक्ष, विभागाध्यक्ष काम करत नाहीत तिथे त्वरित पर्याय शोधा मनसे अध्यक्ष राज ठाकरेंचे आदेश. मनसेच्या केंद्रीय समितीच्या बैठकीत त्यांनी हे आदेश दिलेत. ३० जूनपर्यंत संबंधित पर्यायासह अहवाल सादर करण्यात सांगण्यात आले आहे.

### पुन्हा एअर इंडियाच्या विमानाचे इमर्जन्सी लँडिंग

नवी दिल्ली–एअर इंडियाच्या बोईंग ७८७–८ ड्रीमलायनर या विमानाने हाँगकाँगवरुन दिल्लीला जाण्यासाठी उड्डाण केले होते. तांत्रिक बिघाड लक्षात येताच वैमानिकाने माघारी परतण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर हाँगकाँग एअरपोर्टवर विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. हा तांत्रिक बिघाड काय आहे? ते अजून स्पष्ट झालेले नाही.

### मुंबईत मरीन ड्राईव्ह चौपाटी लोकांसाठी बंद

मुंबई : मरीन ड्राईव्ह समुद्र चौपाटी लोकांसाठी बंद करण्यात आली असून मुंबईत पावसाचा जोर वाढल्याने खबरदारी घेण्यात आली आहे. लोकांना किनारपट्टी पासून दूर करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

### पूल धोकादायक असल्याचा बोर्ड होता– फडणवीस

पुणे : मावळच्या कुंडमळा पुलावर धोकादायक असा बोर्ड लावल्यानंतरही पर्यटक तिथे गेल्याचा उल्लेख मुख्यमंत्र्यांनी केला. इतकंच नाहीतर मावळ दुर्घटनेसारख्या जवळपास ५०० जागा धोकादायक असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिली. अशा धोकादायक ठिकाणी बोर्ड लावूनही पर्यटक जातात. त्यामुळे पर्यटकांना कसे सुरक्षित ठेवता येईल त्यासाठी प्रयत्न केले गेले पाहिजेत अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्र्यांनी दिली.

### माजी कृषिमंत्री धनंजय मुंडेंच्या अडचणीत वाढ

मुंबई : माजी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधात राज्याच्या लोकायुक्तांकडे कृषी विभागात झालेल्या घोटाळ्यासंदर्भात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानियांनी तक्रार केली होती. या तक्रारीवर सोमवारी पहिली ऑनलाईन सुनावणी पार पडली. ज्यामध्ये लोकायुक्तांनी राज्याचे प्रधान सचिव, कृषी सचिव यांच्यासह एसीबीला तीन आठवड्यांत चौकशी अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. अंजली दमानियांनी ट्विटद्वारे ही माहिती दिली आहे. त्यामुळे धनंजय मुंडे यांच्याभोवती अडचणींचा फास आणखी आवळला जात आहे. लोकायुक्तांपुढे पुढील सुनावणी पाच ऑगस्टला होणार आहे.

### कुंडमळा पुलासाठी मंजूर ८ कोटी गेले कुठे?– संजय राऊत

मुंबई : कुंडमळा पुलाच्या निधीवरुन आता शिवसेना खासदार संजय राऊत यांनी सवाल उपस्थित केला असून या पुलासाठी मंजूर झालेले ८ कोटी गेले कुठे? असा प्रश्न राऊतांनी विचारला आहे. ८ कोटी मंजूर, मात्र सही ८० हजाराच्या पत्रावर असा आरोप राऊतांनी तत्कालीन मंत्री रविंद्र चव्हाणांवर केला आहे.


# आता नवं संकट, पुढील ४८ तास धोक्याचे!

## आयएमडीकडून महाराष्ट्रातील या भागांना रेड अलर्ट

**पुणे । प्रतिनिधी**

**पुढील ४८ तासांमध्ये राज्यात पावसाचा जोर आणखी वाढणार आहे, काही भागांना आयएमडीकडून पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला असून, नागरिकांना सतर्क राहण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.**

यंदा मान्सून वेळेपूर्वीच महाराष्ट्रात दाखल झाला, तब्बल १२ दिवस आधी मान्सूनं राज्यात एन्ट्री केली. साधारणपणे ७ जूनच्या आसपास मान्सून राज्यात दाखल होत असतो. मात्र यावर्षी २५ मे रोजीच मान्सूनने राज्यात प्रवेश केला. सुरुवातीला काही दिवस राज्यातील अनेक भागांमध्ये चांगला पाऊस झाला, मात्र त्यानंतर पावसाने काहीशी उघडीप दिल्याचे पाहायला मिळाले होते. आता पुन्हा एकदा पावसाने दमदार पुनरागमन केले आहे. राज्यात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.



### काय आहे हवामान विभागाचा इशारा?

पुणे हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एस.डी. सानप यांनी दिलेल्या माहितीनुसार कोकण, गोवा आणि घाटमाथ्यावर अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असून, हवामान विभागाकडून पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर उद्या कोकणाला पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे, पुढील २४ तासांमध्ये कोकणात अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. पुढील पाच दिवस राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे, असे सानप यांनी म्हटले आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांनी आता पेरणी करण्यास हरकत नाही, असेही त्यांनी यावेळी म्हटले आहे.

# आरक्षण द्या, नाहीतर मुंबईत ७ कोटी मराठा धडकणार!

## मनोज जरांगे पुन्हा आक्रमक; २९ ऑगस्टपर्यंत सरकारला अल्टिमेटम





**जालना । प्रतिनिधी**

**मनोज जरांगे हे मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. त्यांनी सरकारला २९ ऑगस्टचा अल्टिमेटम दिला असून मागण्या मान्य केल्या नाही तर ७ कोटी मराठा मुंबईत धडकतील, असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे. त्यामुळे फडणवीस सरकारची डोकेदुखी वाढणार असल्याचे दिसते.**

मनोज जरांगे गेल्या अनेक महिन्यांपासून मराठा समाजाच्या आरक्षणाचा विषय मार्गी लावावा अशी मागणी करत आहेत. मराठे आणि कुणबी एकच असून राज्यातील सर्व मराठा समाजाला आरक्षण द्यावे, अशी मागणी ते करत आहेत. मात्र सरकार

पान २ वर

### मंत्री सिरसाटांच्या भेटीनंतर जरांगेंचा मोठा निर्णय

पालकमंत्री संजय सिरसाट यांनी सोमवारी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची आंतरवालीत अत्यंत तातडीची भेट घेतली आहे. या भेटतीत दोघांमध्ये महत्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. यावेळी मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आम्ही राज्यातील प्रत्येक आमदार खासदार, मंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मुख्यमंत्री यांना अंतरवाली सराटी येथे बोलावणार आहोत. तसेच येत्या तीन महिन्यात मी कोणालाही बोलणार नसल्याचे जरांगे पाटील यांनी या भेटीनंतर जाहीर केले.



## पंतप्रधान नरेंद्र मोदींना सायप्रसचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

निकोसिया येथील राष्ट्रपती निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सोमवारी (दि.१६) सायप्रसमधील ग्रँड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ मकारिओस

पान २ वर

# डिजिटल कृषी पायाभूत सुविधांसाठी ६ हजार कोटी

## पीएम–किसान, पीक विमा, किसान क्रेडीट कार्ड आयडीशी जोडणार

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**केंद्र सरकारने डिजिटल शेती मिशन अंतर्गत अ‍ॅग्री स्टॅकच्या अंमलबजावणीसाठी ६ हजार कोटी रुपये मंजूर केले आहेत. शेतकरी रजिस्ट्री आणि वारस नोंदणीसाठी ४,००० कोटी रुपये आणि डिजिटल पीक सर्वेक्षणासाठी २,००० कोटी रुपये प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर वाटप केले जाणार आहेत, असे केंद्रीय कृषी मंत्रालयाचे सचिव देवेश चतुर्वेदी यांनी सांगितले.**



कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने नवी दिल्लीतील सुषमा स्वराज भवन येथे आयोजित केलेल्या ‘अ‍ॅग्री स्टॅक: डेटाचे वितरणात रूपांतर करणे’ या राष्ट्रीय परिषदेत केंद्र आणि राज्य सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याबाबत चर्चा केली. या परिषदेत डिजिटल शेतीची प्रगती, आव्हाने आणि भविष्यातील दिशा यावर सविस्तर विचारविनिमय झाला. परिषदेतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे महाराष्ट्र, केरळ, बिहार आणि ओडिशा या राज्यांनी तसेच पीएसबी अलायन्सने राष्ट्रीय शेतकरी कल्याण कार्यक्रम अंमलबजावणी सोसायटी सोबत सामंजस्य करार केले. या करारामुळे शेतकरी

पान २ वर

# कृत्रिम टंचाई अन् लिंकिंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा

## धनंजय मुंडे यांच्या कृषी अधिकाऱ्यांना सूचना

परळी वै.। प्रतिनिधी

पेरणीच्या तोंडावर काही डीलर्स स्वतःकडे खताचा साठा असूनही तो लपवत असल्याचा व कृत्रिम टंचाई निर्माण करत असल्याच्या तक्रारी येत असून, कृषी विभागाकडूनही काही प्रमाणात खत येणे बाकी असून आवश्यक साठा तातडीने उपलब्ध करून देण्यात यावा, तसेच स्थानिक डीलर्स कडे उपलब्ध असलेल्या साठ्याची आकडेवारी तात्काळ समोर आणावी, अशा सूचना आज माजी कृषमंत्री, आ. धनंजय मुंडे यांनी खत व्यवस्थापन प्रमुख तसेच स्थानिक तालुका कृषी अधिकारी यांना केल्या आहेत.



जून अखेर परळी मतदारसंघात


पान २ वर

### दौंड–पुणेदरम्यान धावणाऱ्या रेल्वेला आग

पुणे : दौंड–पुणे दरम्यान धावणाऱ्या रेल्वेला आग लागली होती. इंजिनापासून तिसऱ्या बोगीत ही आग लागली होती. आगीमुळे डब्यात धुराचे लोट होते तर आगीमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण झाले होते.

# जातीय जणगणनेची अखेर तारीख ठरली!

## केंद्र सरकारकडून अधिसूचना जाहिर, दोन टप्प्यात होणार जनगणना



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

मागील वर्षी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संसदेच्या अधिवेशनात केंद्र सरकार आणि भाजपाला ठणकावून सांगत आम्ही याच सभागृहात जातीय जणगणना करायला भाग पाडू असे आव्हान दिले. त्यानंतर अधिवेशानंतर अखेर पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जातीय जणगणना करणार असल्याची घोषणा केली. परंतु आता बिहार, उत्तर प्रदेश राज्यातील आगामी विधानसभा निवडणूकीला उशीर असला तरी त्या निवडणूकांचा कार्यक्रम समोर ठेवून केंद्र सरकारने जातीय जणगणनेसंदर्भात सोमवारी अधिसूचना जारी केली.

केंद्र सरकारने २०२७ मध्ये जातीय जणगणनेसह

पान २ वर

# दोषींवर मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करा

## इंद्रायणी पूल दुर्घटनेप्रकरणी हर्षवर्धन सपकाळ यांची मागणी



**मुंबई । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील इंद्रायणी नदीवरील पुल कोसळून झालेले मृत्यू हे सरकारच्या हलगर्जीपणाने घेतलेले बळी आहेत. कुंडमळा येथे पावसाळ्यात शेकडो पर्यटक येतात याची माहित असताना तो धोकादायक पुल खुला का ठेवला? असा प्रश्न विचारून हे सरकारने घेतलेले बळी आहेत, जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिका–यांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करा, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, कुंडमळा येथील लोखंडी पुल कमकुवत झाला होता, त्याच्यासाठी वर्षभरापूर्वी निधीही मंजूर केल्याचे सरकार सांगत आहे. मग वर्षभर काम का झाले नाही? सरकार दुर्घटना होण्याची वाट पहात बसले होते का? त्या पुलावर पाटी लावली होती असे प्रशासन सांगत आहे. पण अशा पाट्या

पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१६ जुन २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २७.०० क्विंटल | २,०१० | २,७९० | २,५२६ |
| ज्वारी/हायब्रिड : ४३.५० क्विंटल | १,८०१ | ३,००१ | २,५४८ |
| मका/लोकल:१०.००क्विंटल | १,७६० | २,८०० | २,२८० |
| तूर : ६२.५० क्विंटल | ६,००० | ६,३३१ | ६,१९२ |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| बाजरी: ४२.५० क्विंटल | १,८०० | २,६१५ | २,३४१ |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन:८०.०० क्विंटल | ४,२०० | ४,२२५ | ४,२१२ |
| हरभरा:१७.०० क्विंटल | ५,२०० | ६,२०२ | ५,६६५ |

# खासगी टुर्स अ‍ॅण्ड ट्रॅव्हल्स कंपन्यांना बस पुरवणार

## एसटी महामंडळाचा मोठा निर्णय; आता लालपरीने धार्मिक स्थळांची सफर

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य महामंडळाची आजपर्यंतची सर्वात जबरदस्त योजना आखली आहे. सर्वसमान्यांना आता धार्मिक पर्यटनस्थळांचे दर्शन घेता येणार आहे. विशेष म्हणजे याचे प्लानिंग खाजगी टूर्स अँड ट्रॅव्हल्स कंपन्या करणार आहेत. अत्यंत कमी खर्चात या सहलींचे आयोजन केले जाणार आहे.**

परिवहन विभागाने सर्वसामान्य प्रवाशांसाठी मोठा निर्णय घेतला आहे. सर्वसामान्य प्रवाशांना धार्मिक स्थळांना भेटी देता याव्यात यासाठी खाजगी टूर्स अँड ट्रॅव्हल्स कंपन्यांनी एसटी सोबत संयुक्तपणे सहली आयोजित करणार आहे. सर्वसामान्य प्रवाशांना कमी खर्चात निवास आणि भोजन व्यवस्थेसह धार्मिक पर्यटनाचा आनंद लुटता येणार आहे. कमी गर्दीच्या दिवसात सहलीचे आयोजन केले जाणार आहे.




### डायरेक्ट शाळेत पास मिळणार

शाळा– महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना एसटीचे पास थेट त्यांच्या शाळेतच वितरित करण्यात येणार आहेत. अशा सूचना परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी स्थानिक एसटी प्रशासनाला केली.

### एसटी महामंडळातंर्गत ५ प्रादेशिक विभागांची निर्मिती

एसटी महामंडळातंर्गत ५ प्रादेशिक विभागांची निर्मिती करण्यात आली आहे. मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती आणि नागपूर असे ५ प्रादेशिक विभाग तयार करण्यात आले आहेत. कर्नाटक परिवहन महामंडळाच्या धर्तीवर महाराष्ट्र एसटी महामंडळातंर्गतही ५ प्रादेशिक विभागांची निर्मिती करण्यात आली आहे.

cmyk

## अग्रलेख

# जग विनाशाकडे यूनो मात्र गोंधळातच

जगात विविध देशांमध्ये सध्या लष्करी संघर्ष तीव्रपणे सुरू असताना युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघ या नावाने ओळखली जाणारी जागतिक संघटना नक्की काय करत आहे याबाबत शंका घेण्यास वाव आहे. जागतिक पातळीवर शांतता राहावी म्हणून स्थापन करण्यात आलेल्या यूनोला जागतिक संघर्षामध्ये कोणतीच भूमिका घेता येत नाही हे पुन्हा एकदा सिद्ध होत आहे. दुसऱ्या महायुद्धामध्ये आण्विक युद्धामुळे जी प्रचंड प्राणहानी झाली, त्यामुळे यूनो सक्रिय झाली होती आणि जगात दीर्घकाळ शांतता राहावी यासाठी प्रयत्नही करण्यात येत होते. या कालावधीमध्ये अमेरिका आणि रशिया सारख्या महासत्तांमध्ये जरी शीतयुद्ध सुरू असले तरी कोणतेही मोठे लष्करी संघर्ष झाले नव्हते. दोन्ही कोरियन देशांमध्ये झालेली युद्ध असोत किंवा भारत-पाकिस्तान, भारत-चीन यासारखे युद्ध असो किंवा व्हिएतनामसारखे युद्ध असो, या लष्करी संघर्षाने संपूर्ण जगावर फारसा फरक पडला नव्हता. पण सध्या २०२५ मध्ये ज्या प्रकारच्या घडामोडी घडत आहेत त्या पाहता सध्याचे लष्करी संघर्ष जगाला पुन्हा एकदा एखाद्या महायुद्धाकडे नेऊ शकतात असे संकेत मिळत आहेत. या पार्श्वभूमीवर देशांची शिखर संघटना असलेल्या यूनोकडून कोणतातरी ठोस पुढाकार अपेक्षित आहे.

अमेरिकेसारखा बलाढ्य देशच यूनोचे अस्तित्व मान्य करत नसल्याने आणि अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनाच जगाचा सर्वेसर्वा व्हायची इच्छा असल्याने ते त्यांच्या सोयीने या लष्करी संघर्षामध्ये भूमिका घेत आहेत. सध्या इराण आणि इस्त्रायल यांच्यात सुरू असलेल्या लष्करी संघर्षाची तीव्रता पाहिली तर हा संघर्ष कोणत्याही टोकाला जाऊ शकतो. रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध गेले तीन वर्षे सुरू असले तरी तो त्यांच्यापुरता मर्यादित विषय राहिला आहे. जरी या संघर्षामध्येही जग 'नाटो'मुळे विभागले गेले असले तरी त्याला धार्मिक पाया नव्हता. पण इस्त्रायल आणि इराण यांच्यातील या लष्करी संघर्षामुळे जगाची जी विभागणी होऊ पाहत आहे त्याला धार्मिक वास येत असल्याने ते अधिक धोकादायक आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये गेल्या महिन्यात जो लष्करी संघर्ष झाला तेव्हासुद्धा भारत आणि पाकिस्तान यांच्या बाजूने जे देश उभे राहिले त्यांच्यामध्येही असा धार्मिक पाया दिसून आला होता. गेल्या आठवड्यात इस्त्रायलने इराणची खोडी काढल्यावर इराणनेसुद्धा त्याला प्रत्युत्तर दिले आणि इस्त्रायलमधील प्रमुख शहरांवर जोरदार मारा केला. इराणच्या नेत्यांनी इस्त्रायलची बाजू घेणार्या अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स या देशांनासुद्धा हल्ला करण्याचा इशारा दिला आहे. जेव्हा अशा प्रकारे दोन देशांमध्ये लष्करी संघर्ष सुरू असतो तेव्हा त्या देशांचे नेते अस्मितेच्या युद्धामध्ये गुंतले असल्याने कोणालाच माघार घ्यायची नसते. अशा वेळीच यूनोसारख्या संघटनांनी पुढाकार घेऊन असा लष्करी संघर्ष थांबवण्याचे प्रयत्न करणे अपेक्षित असते. पण गेल्या काही वर्षांमध्ये यूनोकडून असे कोणतेही प्रयत्न होताना दिसत नाहीत. फक्त एखादे परिपत्रक काढून अशा लष्करी संघर्षाचा निषेध करणे इतकेच काम यूनोकडून केले जाते.

अमेरिका किंवा रशिया यासारख्या मोठ्या देशांवर नियंत्रण ठेवणेसुद्धा यूनोला शक्य राहिलेले नाही. साहजिकच अमेरिका जी भूमिका घेते त्याभोवती संपूर्ण जग फिरत असते हेच गेल्या काही वर्षांमध्ये लक्षात आले आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील लष्करी संघर्ष माझ्यामुळेच सुटला असे डोनाल्ड ट्रम्प सतत म्हणत आहेत. त्याचा संदर्भसुद्धा या ठिकाणी महत्त्वाचा मानावा लागेल. यूनोचे काम संपूर्णपणे निष्क्रिय झाल्यानेच अमेरिकेसारखे देश आणि त्यांचे नेते जगावर नियंत्रण मिळवण्याच्या दृष्टिकोनातून असे काही निर्णय घेत राहतात. अर्थात जगातील जे लष्करी संघर्ष आहेत त्यापैकी कोणते थांबवायचे आणि कोणते जास्त पेटवायचे हे त्यांच्या सोयीप्रमाणेच ठरत असते हेसुद्धा लक्षात घ्यावे लागते.

तीन वर्षांपासून सुरू असलेला रशिया-युक्रेन संघर्षापेक्षाही सध्या इराण आणि इस्त्रायलमध्ये सुरू असलेला लष्करी संघर्ष गंभीर आहे. इस्त्रायलला पाठिंबा देणार्या ब्रिटन, अमेरिका आणि इतर देशांची लष्करी तळे आणि व्यापारी जहाजे यांना लक्ष्य करण्याचा इशारा इराणने दिला असल्याने हा संघर्ष कोणत्या दिशेने जात आहे हे जागतिक नेत्यांनी लक्षात घ्यायला हवे. जगातील बहुतेक देश सध्या अण्वस्त्रधारी आहेत आणि जर धार्मिक अस्मितेचा विषय जास्त ताणला गेला तर इराणसारखे देश अण्वस्त्रांचा वापर करण्यास मागे पुढे पाहणार नाहीत. पाकिस्ताननेसुद्धा भारतासोबतच्या लष्करी संघर्षामध्ये अप्रत्यक्षपणे आम्ही अण्वस्त्रधारी आहोत असा इशारा दिला होता. दुसऱ्या महायुद्धामध्ये अण्वस्त्रांचा वापर झाल्यामुळे जी प्रचंड हानी झाली त्यामुळेच यूनोला पुढाकार घेऊन जागतिक शांतता प्रस्थापित करावी लागली होती आणि आता पुन्हा एकदा जग आण्विक युद्धाकडे वळू पहात असेल तर यूनोला पुन्हा एकदा सक्रिय व्हावे लागेल. अर्थात विविध प्रमुख देशांच्या नेत्यांच्या माध्यमातूनच यूनोची संघटना तयार झाली असल्याने जगातील प्रमुख नेत्यांनाच यूनोच्या माध्यमातून जागतिक पातळीवर शांतता नांदावी यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत.

# ऑनलाइन घरकुलासाठी कोणालाही पैसे देऊ नये -नवनाथ शिराळे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

सध्या घरकुल ऑनलाईन करण्याची प्रक्रिया १८ तारीख असल्याचे समजते तरी काही दलाल गोरगरीब लोकांना अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून लोकांच्या खिशावर अधिकाऱ्याच्या संगणमताने डल्ला मारण्याचे काम करत असल्याचे सध्या दिसत आहे तरी अशा दलालखोर लोकांना कोणीही पैसे देऊ नयेत ऑनलाईन प्रक्रिया ही स्वतः सेल्फ आपल्या मोबाईल वरती करण्यासाठी मोदी सरकारने लोकांच्या हितासाठी ही योजना केलेली आहे एका मोबाईल वरती एकच घरकुल ऑनलाईन करता येते या घरकुल योजनेच्या वेबसाईटवर जाऊन त्या ठिकाणी आपले आधार लिंक नंबर टाकून नाव नोंदणी करण्यात यावी



याच्यासाठी कोणत्याही कर्मचाऱ्याला व त्याच्या दलाला कोणत्याही नागरिकांनी पैसे देऊ नयेत जर कोणी पैसे मागण्याचा प्रयत्न करत असेल तर डायरेक्ट आमच्याशी संपर्क साधावा किंवा पोलीस प्रशासनाचे अँटीकरप्शन पोलीस यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा भाजपा नेते नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी केले आहे बीड जिल्ह्यामध्ये नगर प्रशासन ग्रामपंचायत पंचायत समिती यांच्या माध्यमातून ही योजना केंद्र सरकार राबवत आहे पण काही कर्मचारी दलाला पुढे करून आपला खिसा चिरीमिरीने भरण्याचा प्रयत्न सध्या करत असल्याचे चित्र सध्या पहावयास मिळत आहे याला आळा घालण्यासाठी नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी एक पत्रक जारी केले आहे त्या पत्रकामध्ये त्यांनी स्वतःचा नंबर दिलेला आहे नंबर आहे ९८ २२ ८७५ ९४५ कोणी जर चिरीमिरी मागात असेल तर या नंबर वरती संपर्क करावा किंवा पोलीस प्रशासनाशी संपर्क करावा लेखी तक्रारीने करावा पैसे कोणालाही पैसे देण्यात येऊ नये ही मा श्री पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांची योजना आहे असे प्रसिद्धी पत्रकार द्वारे नवनाथ शिराळे पाटील पाटील व माजी नगरसेवक बाबुराव परळकर यांनी कळवले आहे .

# अ दर्जाची बाजार समिती वर कर्मचाऱ्यांची प्रशासकीय नियुक्ती

**जालना । प्रतिनिधी**

जालना कृषी उत्पन्न बाजार समिती इथे शासनाच्या वतीने प्रशासकीय अधिकाऱ्याची नियुक्ती न करता कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली यासंदर्भात काही तज्ञ कडून असे सांगण्यात येते की शासनाचे अधिकाऱ्यांचं डोकं ठिकाणावर आहे का नाही असे बोलले जात आहे. नियमाप्रमाणे जालना कृषी उत्पन्न बाजार समिती अ दर्जा मध्ये येत आहे तसेच सदरील बाजार समितीचे उलढाल कोटी रुपयांमध्ये आहे अशा बाजार समितीमध्ये सहाय्यक निबंध अधिकाऱ्याची नियुक्ती करणे गरजेचे होतं. तसेच जिल्ह्यामध्ये जिल्हा उप निबंध कार्यालयामध्ये एक सहाय्यक निबंध व तसेच असे एकूण नऊ सहाय्यक निबंधक अधिकारी आहे यापैकी एक सहाय्यक निबंध जालना बाजार समितीचे प्रशासकीय नियुक्ती करणे गरजेचे होतं तसेच जिल्हा उपनिबंधक यांनी असा अहवाल वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे पाठविणे गरजेचे होते. तसेच कलास थ्री चा कर्मचारी नियुक्ती करणे ही चुकीचे पद्धत आहे. कर्मचाऱ्यांची प्रशासकीय नियुक्ती केल्यामुळे जालना बाजार समितीमध्ये मोठा भ्रष्टाचार होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे काही तज्ञ नागरिक व व्यापाऱ्याकडून बोलल्या जात असल्याचे चर्चा आहे.

# घनसावंगी येथे विश्रामगृहात शिवसेना दलित आघाडी मेळावा



**जालना । प्रतिनिधी**

**घनसावंगी येथे विश्रामगृह परिसरात आज दिनांक १६ जून रोजी दुपारी दोन वाजता शिवसेना दलित आघाडी कार्यकर्ता मेळावा शिवसेना दलित आघाडी प्रमुख यांचे उपस्थितीत पार पडला आहे. यावेळी उपस्थित शिवसेना दलित आघाडी घनसावंगी प्रमुख पदाधिकारी यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.**

या कार्यक्रमास तालुक्यातील शिवसेना दलीत आघाडी कार्यकर्ते पदाधिकारी महिला, नागरिक, गायरान कास्तकार, आदींची या कार्यक्रमास उपस्थिती होती. उपमुख्यमंत्री शिवसेना शिंदे गट शिवसेना संपर्क प्रमुख पंडीत भुतेकर शिवसेना दलित आघाडी जिल्हाप्रमुख अँड भास्कर मगरे आदींनी उपस्तिताना यावोळी मार्गदर्शन केले.व तसेच नागरिकांच्या समस्या सोडण्यात आल्या.

# श्रीमंतयोगी आश्रम शाळेत प्रवेशोत्सव साजरा

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरातील बहिरवाडी भागात असणाऱ्या श्रीमंतयोगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक निवासी आश्रम शाळेत सोमवार दिनांक १६ रोजी प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**

या बाबत अधिक माहिती अशी की बीड शहरातील बहिरवाडी भागात असणाऱ्या श्रीमंतयोगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक निवासी आश्रम शाळेत सोमवार दिनांक १६ रोजी नवीन शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ मध्ये नव्याने शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना इतर मागास बहुजन कल्याण विभाग बीड चे निरीक्षक लक्ष्मण बारगजे यांच्या प्रमुख उपस्थितीत व शुभहस्ते पाठ्यपुस्तके, सर्व शैक्षणिक साहित्य, खाऊ, गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी मनोगतामध्ये लक्ष्मण बारगजे यांनी



आश्रम शाळेमध्ये विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गातील गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी अतिशय चांगल्या सुविधेसह दर्जेदार शिक्षण व इतर स्पर्धा परीक्षांमध्ये सहभाग नोंदवून नावीन्यपूर्ण कामगिरी आश्रम शाळेतील सर्व शिक्षक करत असल्याचे सांगितले. आश्रम शाळेतील विद्यार्थी आज डॉक्टर, इंजिनिअर, अधिकारी, राष्ट्रीय खेळाडू अशा विविध क्षेत्रात पोचलेले आहेत. शिवाय आश्रम शाळेतील विद्यार्थी हा आपलाच पाल्य समजून त्यांची वैयक्तिकरित्या काळजी घेण्याचा अनमोल सल्ला दिला. यावेळी श्री. प्रसाद शुक्ला, श्री. कोलंगडे सर प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. भडके एन. एम. माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. धुमाळ एम. एम. तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# गेवराई येथे मतिमंद निवासी विद्यालयात प्रवेशोत्सव साजरा

## दव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्यासह गुलाब पुष्प देवून केले स्वागत

**गेवराई । प्रतिनिधी**

**राज्यातील सर्व माध्यमाच्या शाळांमध्ये १६ जून पासून शैक्षणिक वर्षाला प्रारंभ झाला असून त्यानिमित्ताने शहरातील मतिमंद निवासी विद्यालयात प्रवेशित दिव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्यासह गुलाब पुष्प देवून प्रवेशोत्सव सोहळा उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. यावेळी प्रतिष्ठित नागरिक, पालक वर्ग व शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

रेणुकामाता बहुउद्देशीय सेवाभावी संस्था महांडूळा संचलित मतिमंद निवासी विद्यालय गेवराई , ता.गेवराई जि.बीड येथे सोमवार दि.१६ जुन २०२५ रोजी प्रवेशित दिव्यांग





विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्यासह गुलाब पुष्प देवून उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता, त्वरितादेवी व डॉ.हेलन केलर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सहसचिव शिवाजी ढोबळे, विशेष शिक्षक रविंद्र अरबाड , डॉ.प्रल्हाद बोंदरे ,वस्तीगृह अधिक्षक संदिप खाडे , कार्यालयीन लिपीक विनोद पौळ , श्रीमती भागिरथी उगले, आकाश गिरी , प्रशांत सरोदे , संतोष पुंड , अक्षय दातार , अंकुश लाटे , रमेश गोळेकर , राजेंद्र ढाकणे , विष्णू बर्वे सह पालक वर्ग, शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरून...

### पंतप्रधान नरेंद्र मोदींना सायप्रसचा सर्वोच्च

हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला. सायप्रस प्रजासत्ताकाचे पहिले अध्यक्ष मकारिओस यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार राष्ट्राच्या प्रशंसनीय सेवेसाठी राष्ट्रप्रमुख आणि इतर महत्त्वाच्या व्यक्तींना प्रदान केला जातो. या सन्मानाबद्दल पंतप्रधान मोदी यांनी क्रिस्टोडोलाइड्स यांच्यासह सायप्रसच्या जनतेचे आभार मानले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, ''सायप्रसमधील सर्वोच्च सन्मान ग्रँड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ मकारिओस या पुरस्काराने माझा सन्मान करण्यात आला याबद्दल मी सायप्रस सरकारचे आणि जनतेचे मनापासून आभार मानतो. हा सन्मान फक्त माझा नाही, तर १४० कोटी भारतीयांचा सन्मान आहे.

------------

### आरक्षण द्या, नाहीतर

आमच्याकडे लक्ष देत नाही, असे जरांगे यांनी म्हटले आहे. तसेच जरांगे यांनी सरकारला यावेळी थेट अल्टिमेटम दिला आहे. येत्या अधिवेशनात आमचा आरक्षणाचा मुद्दा मार्गी लावा, गुलाल घेऊन येतो. मी २९ ऑगस्टपर्यंत काहीही बोलणार नाही. मी मुंबईला आलो तर परत जाणार नाही, असा थेट इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. तसेच यावेळी मुंबईत ७ कोटी मराठा धडकतील, असेही ते म्हणाले. जरांगे पाटील मराठा आरक्षणावरुन पुन्हा आक्रमक झाल्याने फडणवीस सरकारची डोकेदुखी वाढणार आहे.

------------

### कृत्रिम टंचाई अन् लिंकिंग

आवश्यक असलेल्या युरियासह, डीएपी व अन्य आवश्यक खतांच्या साठ्यामध्ये जो फरक आहे, तो फरक रेक लावून तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावा याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांशीही धनंजय मुंडे यांनी दूरध्वनीवरून संपर्क साधत सूचना केल्या. खताची कृत्रिम टंचाई निर्माण करणे तसेच प्रमुख मागण्या असलेली व नामांकित खते डावलून जाणीवपूर्वक लिंकिंग करत निकृष्ट दर्जाची खते पर्याय म्हणून जबरदस्तीने विकणाऱ्या डीलर्स व दुकानदारांची नावे उघड करून त्यांच्यावरती तातडीने शासन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी असेही सूचना धनंजय मुंडे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. खरीप हंगामाच्या तोंडावर खत बियाण्यांच्या पुरवठ्यामध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, यासाठी बफर स्टॉक सह यापुढील प्रत्येक घडामोडीची आकडेवारी सह माहिती देण्यात यावी याबाबतही धनंजय मुंडे यांनी अधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत. यावेळी प्र. तहसीलदार श्रीमती पठाण, ए डी ओ गरांडे, परळी व अंबाजोगाई चे तालुका कृषी अधिकारी, गटविकास अधिकारी संजय केंद्रे, अजय मुंडे, अभय मुंडे, राजाभाऊ पौळ यांसह आदी उपस्थित होते.

**जनता संवाद, गर्दी अन् जागच्या जागीच तोडगा, धनंजय मुंडेंचा दरबार पुन्हा गजबजला...!**

धनंजय मुंडे जिथे जातील तिथे गर्दी, आपल्या समस्या, अडचणी व मागण्या घेऊन येणारे कार्यकर्ते व सामान्य नागरिक आणि त्याच ठिकाणी त्यांच्या समस्यांवर जागच्या जागीच तोडगा काढणारे धनंजय मुंडे, असे धनंजय मुंडे यांच्या जनता दरबाराचे स्वरूप सबंध राज्याला परिचित आहे! आजापणामुळे व विविध आघात सहन केल्यानंतर काही दिवस विश्रांती घेऊन पुन्हा सक्रिय झालेल्या धनंजय मुंडे यांच्या भोवती पुन्हा तितक्याच ताकदीने परळी मतदारसंघ, बीड जिल्हा इतकेच नव्हे तर जिल्हा बाहेरून देखील कार्यकर्ते व सामान्य नागरिकांची गर्दी जमा होऊ लागली असून, त्यांच्या समस्या व मागण्या जाणून घेत जागच्या जागीच त्यावर तोडगा काढण्याची धनंजय मुंडे यांची प्रचलित कार्यपद्धती पुन्हा एकदा पाहायला मिळते आहे.

--------------

### डिजिटल कृषी पायाभूत सुविधांसाठी

रजिस्ट्रीद्वारे डिजिटल पद्धतीने कर्ज सुविधा उपलब्ध होणार असून, विशेषतः लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना कागदपत्रांच्या जटिल प्रक्रियेतून मुक्ती मिळेल. याशिवाय, विशेष केंद्रीय सहाय्य (एससीए) मार्गदर्शक तत्त्वांचे संयुक्तपणे उद्घाटन झाले. यात शेतकरी रजिस्ट्री आणि वारस नोंदणीसाठी ४,००० कोटी रुपये आणि डिजिटल पीक सर्वेक्षणासाठी २,००० कोटी रुपये प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर वाटप केले जाणार आहेत. कृषी सचिव देवेश चतुर्वेदी यांनी स्वागतपर भाषणात डिजिटल तंत्रज्ञानाद्वारे पारदर्शी आणि शेतकरीकेंद्रित प्रशासनाची सरकारची बांधिलकी अधोरेखित केली. त्यांनी राज्यांना शेतकरी रजिस्ट्री अद्ययावत करून त्यास जमिनीच्या नोंदींसह (आरओआर) जोडण्याचे आणि योजनांच्या अंमलबजावणीसाठी डिजिटल डेटाचा वापर करण्याचे आवाहन केले. भूमी संसाधन विभागाच्या सचिवांनी आधार संलग्नीकरण आणि डिजिटल जमीन नोंदींच्या महत्त्वावर भर देत ग्रामीण भागातील जमिनीच्या मूल्यातील घट आणि उत्पन्नातील समस्यांवर प्रकाश टाकला. अतिरिक्त सचिव (डिजिटल) प्रमोद कुमार मेहरदा यांनी ॲग्री स्टॅकचे सविस्तर विवेचन केले. यात शेतकरी आयडीला पीएम-किसान, पंतप्रधान पीक विमा योजना, किसान क्रेडीट कार्ड यांसारख्या योजनांशी जोडण्याची प्रक्रिया समाविष्ट आहे. यावेळी शेतकऱ्यांना त्यांची जमीन आणि पिकाची माहिती सुरक्षितपणे देण्यास सक्षम करणाऱ्या डिजिटल सत्यापित प्रमाणपत्र (डीव्हीसी) आणि शेतकरी अधिकृतता प्रणाली यांसारख्या नव्या सुविधांचाही परिचय करून देण्यात आला.

**एआय चॅटबॉटचे सादरीकरण**

परिषदेत गुगल जेमिनीवर आधारित एआय चॅटबॉटचे सादरीकरण करण्यात आले, जे ॲग्री स्टॅक डेटावर प्रशिक्षित असून अनेक भाषांमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकते. याशिवाय, पीक ओळख, सर्वेक्षकांचे चेहरा सत्यापन आणि बॅकएंड कोड ऑप्टिमायझेशनसाठी एआय साधनांचे प्रायोगिक चाचण्या सुरू असल्याचेही सांगण्यात आले.

---------------

### दोषींवर मनुष्यवधाचे गुन्हे

लावून पाट्या टाकण्याचेच काम शासन व प्रशासन करत आहे. ५५ पर्यटक वाहून गेले, त्यातील अनेकांना वाचवण्यात आले, पण चार जण ठार झाले तर सहा गंभीर जखमी झाले, याला जबाबदार कोण? जोपर्यंत कठोर शिक्षा होत नाही तोपर्यंत कोणीही गांभिर्याने घेणार नाही व अशा दुर्घटना होऊन निष्पाप लोक मात्र मरत राहतील. पुल दुर्घटनेनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व धोकादायक पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचे निर्देश दिले आहेत. हा प्रकार म्हणजे 'वरातीमागून घोडे' असा आहे. दुर्घटना होतात, लोक मरतात आणि सरकार काही पैसे तोंडावर फेकून 'ये रे माझ्या मागल्या' सारखे पुन्हा तेच होत रहाते, हे दुष्टचक्र थांबले पाहिजे, असेही सपकाळ म्हणाले.

**राजकोटवरील पुतळ्यात पुन्हा भ्रष्टाचार**

छत्रपती शिवाजी महाराज यांचा राजकोट किल्ल्यावरील पुतळ्याच्या चबुत-याला मोठे भगदाड पडले आहे. निकृष्ट बांधकामामुळेच हे भगदाड पडले आहे. ११ मे रोजी या पुतळ्याचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले होते. अवघ्या महिन्याभरातच भगदाड पडत असेल तर त्या बांधकामाचा दर्जा काय असेल, हे यावरून दिसते महाभ्रष्ट महायुतीने महापुरुषांच्या पुतळ्यालाही भ्रष्टाचाराची कीड लावली आहे असेच यावरून स्पष्ट होते, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

----------

### जातीय जणगणनेची अखेर

भारतातील १६ वी जनगणना करण्यासाठी अधिसूचना जारी केली, २०११ मध्ये शेवटची जणगणना करण्यात आली होती. त्यानंतर तब्बल १६ वर्षानंतर देशातील जणगणना करण्यात येत आहे. वास्तविक पाहता जणगणना दर १० वर्षांनी करणे केंद्र सरकारवर बंधनकारक आहे. परंतु केंद्रातील भाजपा सरकारने मात्र जणगणनेस अधिकच्या ६ वर्षांनंतर काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या आग्रही मागणीमुळे अखेर १६ वर्षानंतर का होईना जणगणने संदर्भात अधिसूचना जारी केली. केंद्र सरकारच्या अधिसूचनेनुसार लडाखसारख्या बर्फाळ भागात १ ऑक्टोबर २०२६ आणि देशातील उर्वरित भागात १ मार्च २०२७ ही जनगणना केली जाईल, असे अधिसूचनेत म्हटले आहे. देशभरातील लोकसंख्येशी संबंधित सर्वात मोठा डेटा करण्यासाठी सुमारे ३४ लाख प्रगणक आणि पर्यवेक्षक आणि डिजिटल उपकरणांनी सज्ज असलेले सुमारे १.३ लाख जनगणना कर्मचारी काम करतील. जनगणनेत, जातीय प्रगणना देखील केली जाईल, असे सरकारी निवेदनात म्हटले आहे.

**दोन टप्प्यात होणार काम**

ही जनगणना दोन टप्प्यात केली जाईल घरांची यादी ऑपरेशन जिथे प्रत्येक घराची राहण्याची परिस्थिती, मालमत्ता आणि सुविधा गोळा केल्या जातील आणि लोकसंख्या गणना, ज्यामध्ये प्रत्येक घरातील प्रत्येक व्यक्तीची लोकसंख्याशास्त्रीय, सामाजिक-आर्थिक, सांस्कृतिक आणि इतर तपशील नोंदवले जातील. जनगणनेत, जात गणना देखील केली जाईल, असे गृह मंत्रालयाने म्हटले आहे. संकलन, प्रसारण आणि साठवणुकीच्या वेळी डेटा सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी अत्यंत कडक डेटा सुरक्षा उपाय ठेवले जातील, असेही सांगण्यात आले आहे.

-------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. १७ जून २०२५



## पेठ बीड पोलीसांची अवैद्य धंद्यावर कारवाई

बीड । प्रतिनिधी

दि.१६/०६/२०२५ रोजी पेठ बीड पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज गोपनिय माहिती मिळाली की, मोमीनपुरा येथे एक ईसम ईलेक्ट्रोनिक साहित्याचा वापर करून व्हिडिओ गेमवर कमी पैशावर जास्त पैशाचे आमीश दाखवून लोकांना व्हिडिओ गेम खेळवित आहे. अशी खात्री लायक माहिती मिळाल्यावरून आम्ही सोबत पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज व सोबत पोह १३५३ सुभाष, पोअं/१९६० अल्ताफ, पोअं/२२१० अशपाक चालक पोह/१७५८ इम्रान यांनी आमिन मेडिकल मोमीनपुरा च्या बाजूला गेमझ्? गोन नावाचा बोर्ड असणा-या गाळयामध्ये छापा टाकला असता वर नमूद वर्णनाचे इलेक्ट्रानिक गेमचे साहित्य व्हिडिओ गेम चालविणारा शेख इम्रान शेख दस्तगीर वय २८ वर्षे रा. मोमीनपुरा हा जागीच मिळून आला व गेम खेळणारे लोक आम्हा पोलीस पार्टीस पाहून पळून गेल्याने पोलीस स्टेशन पेठ बीड येथे गु.र.नं. १७१/२०२५ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदया प्रमाणे गुन्हा नोंद करून आरोपी च्या ताब्यातील व्हिडिओ गेमचे साहित्य व रोख रक्कम असा एकूण एकूण ४२,७५०/- रूपायाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक सो नवनीत काँवत साहेब, मा. अप्पर पोलीस अधीक्षक सो सचिन पांडकर, मा.उपविभागीय पोलीस अधीकारी यांचे नेतृत्वाखाली मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज, पोह १३५३ सुभाष, पोअं/१९६० अल्ताफ, पोअं/२२१० अशपाक, चालक पोह/१७५८ इम्रान सर्व नेमणूक पोलीस स्टेशन पेठ बीड यांनी पार पाडली.

# लाच घेतली, एकाला झाली अटक
# गेवराई पंचायत समितीत सन्नाटा

गेवराई । प्रतिनिधी

**गेवराई पंचायत समिती कार्यालयातील, स्वच्छ भारत अभियान विभागात कार्यरत असलेल्या एका कर्मचाऱ्यांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सोमवार ता. १६ रोजी दुपारी कारवाई केली आहे. या कारवाईने पंचायत समिती परिसरात खळबळ उडाली आहे. घटना घडताच, पंचायत समिती कार्यालयात शुकशुकाट दिसून आला. अनेक अधिकारी कर्मचाऱ्यांनी पंचायत समिती कार्यालयातून निघून गेले. दरम्यान , गेवराई पंचायत समितीच्या भ्रष्ट कारभाराने कळस गाठला असून, आणखी काही अधिकारी, कर्मचाऱ्यारी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या रडावर असल्याची चर्चा आहे.**

गेवराई पंचायत समिती कार्यालयातील स्वच्छता अभियान विभागात एका व्यक्तीचे काम करण्यास टाळाटाळ केली जात होती.




संबंधित कर्मचारी चव्हाण यांनी तक्रारदाराकडे पैशाची मागणी केली. त्या संदर्भाने सोमवार ता. १६ रोजी दु. २ वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पंचायत समिती कार्यालयात सापळा रचून कारवाई केली आहे. घटना घडताच, पंचायत समिती परिसरात एकच गोंधळ उडाला. काय झाले, हेच लवकर कळाले नाही. कार्यालयीन कामाचा पहिलाच दिवस असल्याने पंचायत समिती परिसरात गर्दी होती. स्वच्छ भारत अभियान विभागात बसलेल्या चव्हाण यांच्यावर कारवाई झाल्याचे समाजात, अन्य कर्मचाऱ्यांनी पंचायत समिती कार्यालयातून काढता पाय घेतला. दरम्यान, पंचायत समिती कार्यालयातील कर्मचारी विलास चव्हाण यांच्यावर कारवाई झाल्याची चर्चा आहे. अधिकृत माहिती उपलब्ध नाही. तक्रार काय आहे. तक्रार कोणी केली. या संदर्भात उलटसुलट चर्चा आहे. अन्य काही भ्रष्ट अधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या रडावर असल्याची माहिती आहे.

### आता बीडकडे लक्ष

गेल्या काही दिवसापासून स्वच्छ भारत मिशनचा भ्रष्टाचार चव्हाट्यावर येत असून बीड पंचायत समितीमध्ये कार्यरत असलेल्या स्वच्छ भारत मिशनचाही अनेक तक्रारी आहे गेवराईनंतर आता बीड चा नंबर लागतो की काय अशी शक्यता वर्तवली जात आहे बीडमध्ये ही अनेक कामासाठी अडवणूक केली जाते अनेक सरपंचांना लाच मागितली जाते त्याशिवाय काम होणार नाही अशी दम दिला जातो त्यामुळे बीडमध्येही कारवाई होण्याच्या शक्यता नाकारता येत नाही अशी चर्चा बीड पंचायत समितीच्या परिसरात चालू आहे.

## पाली जि.प.शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

**सोमवार १६ जून २०२५ पी. एम. श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, पाली येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अप्पर जिल्हाधिकारी हरिषजी धार्मिक उपस्थित होते. यावेळी त्यांच्या उपस्थितीत नवागतांचे स्वागत शाळेच्या वतीने मोफत पुस्तक व गणवेष देऊन करण्यात आले.**



तसेच शाळेतील माझी विद्यार्थिनी दिव्यांगातून पूजा नवले आणि नीट मधून शुभम खरात यांनी विशेष प्राविण्य मिळवले त्याबद्दल त्यांचा प्रशालेतर्फे विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय लाड सर होते. या प्रवेशोत्सवासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रवीणजी येवले, उपाध्यक्ष सिद्धेश्वर नवले, तसेच सदस्य गणेशजी नवले,किशोर नवले,गीता राऊत, अनिता वीर, मुरलीधर नवले, शितलताई चाटे, मंडळ अधिकारी, अनिल गायकवाड तलाठी पाली,उपसरपंच महेंद्रजी वीर, आणि सर्व शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेष, सॉक्स व बूट वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मुंडे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीमती काब्दे मॅडम, म्हेत्रे मॅडम, खाडे मॅडम, मुळे मॅडम, जगताप मॅडम, सवयी मॅडम, हंगे मॅडम, जाधव मॅडम, तळेकर सर, आघाव सर,राठोड सर, पायके सर, डोंगर सर, तसेच साळुंखे सर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या आभार प्रदर्शन म्हेत्रे मॅडम यांनी केले.


# ऑनलाईन रम्मीचा नादामध्ये अखवे कुटुंब संपवले

धाराशीव । प्रतिनिधी

**ऑनलाईन रम्मी गेममध्ये मोठ्या प्रमाणावर पैसे गमावल्याने कर्जबाजारी झालेल्या लक्ष्मण मारुती जाधव या ३० वर्षीय इसमाने आपल्या बायको आणि दोन वर्षांच्या मुलाची हत्या स्वतःही आत्महत्या केल्याची घटना धाराशिव तालुक्यातील बावी येथे घडली.**

पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, लक्ष्मण आणि तेजस्विनी यांचा तीन वर्षापूर्वी प्रेमविवाह झाला होता. दोघांना शिवांश नावाचा दोन वर्षांचा मुलगा होता. जाधव यांचा सुखी संसार सुरु होता. मात्र दरम्यान लक्ष्मण जाधव ऑनलाईन गेम रम्मी खेळत असे. याशिवाय त्याने शेअर बाजारातही पैसे गुंतवले होते.

मात्र या दोन्ही ठिकाणी त्याला मोठं आर्थिक नुकसान झालं होतं. यातून तो कर्जबाजारी झाला होता. कर्ज फेडण्यासाठी त्याने त्याने जमीन काही दिवसांपूर्वी विकली होती. तर काही दिवसांपूर्वीच त्याने राहतं घर देखील विकलं होतं. मात्र तरीही कर्ज फिटलं नाही. आता परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचं लक्षात आल्याने लक्ष्मण जाधव यांना पत्नी आणि मुलाला संपवून आत्महत्या केल्याचा अंदाज पोलिसांना व्यक्त केला आहे. घटनेची माहिती मिळताच धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मारुती शेळके घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टेमसाठी पाठवण्यात आले आहेत. अंतिम कारण पोस्टमार्टेम अहवालानंतर स्पष्ट होईल, अशी माहिती पोलिसांनी दिली.



## जय जवान माध्यमिक विद्यालय कवडगाव शाळा प्रवेशोत्सव साजरा

वडवणी । प्रतिनिधी

दि.१६ जून २०२५ रोजी नवीन शैक्षणिक वर्ष २०२५- २०२६ या सुरू होणाऱ्या नवीन शैक्षणिक वर्षे निम्मित जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव येथे शाळेचा पहिला दिवस व या दिवशी नव-गताचे नव्याने प्रवेशित सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचे शालेय व्यवस्थापन, संस्था अध्यक्षा, सचिव पदाधिकारी अध्यक्ष सदस्य सर्व ज्येष्ठ नागरिक, पालक वृंद,सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, या सर्वांनी पुष्प गुच्छ देवून नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी सदरील कार्यक्रम सुरवात ही आधुनिक स्त्री शिक्षणाची जननी, पहिल्या स्त्री शिक्षिका माता सावित्रीबाई फुले यांच्या पावन प्रतिमेचे उपस्थित सर्व मान्यवर, पालक यांच्या हस्ते पुष्पहार, पुष्प अर्पण करून पूजन करण्यात आले. या कार्यक्रमात सहभागी सरपंच उपसरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य



व पदाधिकारी, शिक्षण प्रेमी जेष्ठ नागरिक, पालक वृंद माजी विद्यार्थी मंडळ व विद्यालयातील प्राचार्य श्री.सारोक्ते डी जी सर यांनी आपल्या विद्यालयात नव्याने प्रवेशित झालेले सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना व्यवस्थापन विद्यालयाच्या वतीने नवीन शैक्षणिक वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या व या पहिल्या दिवशी सर्व विद्यार्थी यांना मोफत पाठ्यपुस्तक व वही पेन प्रत्येक विद्यार्थ्यांना देवून त्यांचे स्वागत केले. त्याच बरोबर पर्यावरण बाबत जन जागृती योजनेच्या माध्यमातून आपण सर्वांनी ''एक पेड माँ के नाम'' या उपक्रमांतर्गत माहिती दिली व वृक्षा रोपण करण्यात आले.तसेच सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना नंतर गोड जेवण शालेय पोषण आहार देण्यात आला. अशा प्रमाणे सदरील कार्यक्रम साठी उपस्थित सर्व मान्यवर ग्रामस्थ शिक्षण प्रेमी पालक वृंद माजी विद्यार्थी मंडळ व विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद घाडगे सर, टाळे सर, हंगे सर, यादव सर, मुंडे सर, येवले सर, चोपडे सर, श्रीमती सौर मॅडम, गोंदरे जी एम, पाखरे व्हि जी, काळे व्ही डी,ससाणे जी एल आदी सर्व उपस्थित होते. व या कार्यक्रमाची सांगता झाली.

## शाळा प्रवेशोत्सव पहिल्या दिवशी जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांनी केले मुली-मुलांचं स्वागत!

जालना । प्रतिनिधी

**राज्यासह जिल्ह्यात आजपासून (दि.१६) जून रोजी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली. आज शाळा सुरू होण्याच्या पहिला दिवस असल्याने जिल्ह्यातील सर्व शाळामध्ये शाळा प्रवेशोत्सव या उपक्रमाच्या माध्यमातून सर्व शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.**

जालना तालूक्यातील दरेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत आज जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी उपस्थित राहून सर्व शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी शालेय विद्यार्थ्यांना सजवलेल्या बैलगाडीतून शाळेत आणण्यात आले. तसेच जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वितरण करण्यात आले. यावेळी शालेय शिक्षण विभागामार्फत 'पहिले पाऊल' या उपक्रमातंर्गत इयत्ता पहिलेमध्ये प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांचे शाळेतील पहिल्या पावलाचे ठसे घेवून त्यांचे शालेय जीवनातील प्रवेशाचे स्वागत करण्यात आले.



यावेळी जालना तहसिदार छाया पवार, जिल्हा परिषद शाळेचे मुख्यध्यापक-शिक्षक, विविध मान्यवर आणि ग्रामस्थांची उपस्थिती होती.

शाळेची गुणवत्ता वाढविण्यासाठी आणि मुलांची उपस्थिती वाढवण्याकरीता शालेय शिक्षण विभागामार्फत आज जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सव उपक्रम साजरा करण्यात आला. शाळा प्रवेशोत्सव उपक्रमांतर्गत विविध मान्यवरांनी जिल्ह्यातील शाळेमध्ये उपस्थित राहून शालेय विद्यार्थ्यांचे उत्सहात स्वागत केले.

## पान ६ वरून...

### आरोग्यदूत मंगेश चिवटे

मित्रपरिवाराचे आभार व्यक्त केले.कार्यक्रमाला उपस्थित शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख महादेव मातकर, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष उपजिल्हाप्रमुख रुग्णसेवक शरद झोडगे,शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष उपजिल्हाप्रमुख रुग्णसेवक शिवराज आंधळकर, युवा नेते अजय जाधव, सुरज निर्मळ,संकेत पाळवदे, किशोर हंगे, सौरभ कुचेकर, हुसेन शेख, सचीन हेगडे, गजानन हेगडे आदी पदाधिकारी व मित्रपरिवार उपस्थित

### छत्रपती शिवाजी विद्यालयात

अनंत शेजुळ, अनंत राठोड, दत्तात्रय इंगळे, सय्यद गयास, मिलिंद देशपांडे, सत्यप्रिया होके पाटील, फरजाना पठाण, स्मिता डाके, शिल्पा शिनगारे, ज्ञानेश्वर पवार, तुळशीराम साळवे, पंकज कळसकर, शेख शहानूर, दत्ता पांडे, दिनकर काळे यांच्यासह सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

### जिल्हा परिषद कारेगव्हाण

प्रशंसा केली. शेवटी शाळेच्या प्रांगणात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे ग्रामस्थांनी स्वगत केले मुख्याध्यापक विकास परदेशी, सहशिक्षक जोगदंड, आणि सहकाऱ्यांनी केले होते. गावात शिक्षण, बालविवाहमुक्ती आणि पर्यावरण यावर सजगतेचा संदेश गेला असून या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### श्री सिध्देश्वर विद्यालयात

करण्यात आले. विद्यार्थी सुरक्षा,

शासनादेशान्वये, विद्यार्थ्यांना नवीन पुस्तक,व नियोजन पुस्तिकेचे वितरण केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचलन श्रीमती अपर्णा मुळे यांनी केले. यानंतर संकुलाचे सर्व मान्यवर व शिक्षक यांनी माजलगाव चे अधिष्ठान दैवत सिध्देश्वर भगवंताच्या मंदीरात जाऊन श्री सिद्धेश्वर देवताचे पूजन करून आशीर्वाद घेतला. या कार्यक्रमास विद्यार्थी शिक्षक,शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## टी.सी.हरवला आहे

सोनू भास्कर खताळ या विद्यार्थ्यांचा इयत्ता दहावी पास चा टी.सी. बीड- निमगाव मायंबा प्रवासादरम्यान हरवला आहे. सापडल्यास संपर्क करा.

**संपर्क : सोनू भास्कर खताळ मो.९२८४०७८७६४**

## जाहीर प्रगटन

मा. श्रीमती एफ. बी. बेग २ रे सह दिवाणी न्यायाधीश व स्तर बीड ता. जि बीड यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ८७०/२०२५

विधीज्ञ श्री. गणेश घुगे

नागरबाई बागलाने वि. निरंक

**मागणी :-बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदार: १) नागरबाई भ्र . तुळशीराम बागलाने वय ६९ वर्षे धंदा. घरकाम रा. गुरुकुल इंग्लिश स्कूल जवळ. जालना रोड बीड

२) राहुल पी. तुळशीराम बागलाने वय ४३ वर्षे धंदा नोकरी रा.वरील प्रमाणे ३) सुनील पी तुळशीराम बागलाने वय ५६ वर्षे धंदा नोकरी रा. वरील प्रमाणे ह. मु. मार्केट यार्ड पुणे ४) नितीन पी. तुळशीराम बागलाने वय ५२ वर्षे धंदा व्यापार व शेती रा. बुंदेलपुरा ता.जी बीड ५) कुसुम भ्र हनुमान गव्हाणे व ५८ वर्षे धंदा घरकाम रा. टाकळगाव ता. जि बीड ६) अंजली भ्र लक्ष्मीकांत लोंढे वय ४५ वर्षे धंदा नोकरी रा. पाटील गल्ली केज ता. केज जि. बीड ७)वैशाली पि.तुळशीराम बागलाने व वैशाली भ्र अविनाश साखरे वय ४५ वर्षे धंदा घरकाम रा. एम के वी रोड विद्यापीठ परिसर परभणी ता.परभणी जि. परभणी

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांची वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे ज्या अर्थी मयत नामे तुळशीराम विश्वनाथराव बागलाने राहणार गुरुकुल इंग्लिश स्कूल जवळ बीड ताजी बीड हे दिनांक २४/०४/२०२५ रोजी गुरुकुल इंग्लिश स्कूल जवळ बीड ता.जी बीड येथे मयत झालेले आहेत.अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी आहे अर्जदार क्र. २ते ४ हे मुले व अर्जदार क्र.५ ते ७ या मुली आहेत अर्जदाराशिवाय मेहता कोणीही वारसदार नाही. मयत नामे तुळशीराम विश्वनाथराव बागलाने यांचे निधन झालेले आहे मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरता सदर वारस करून पत्राची आवश्यकता आहे त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की सदरहु अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याची असेल तर या जाहीरनाम्याची तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदर व मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदर व कोर्ट सदर व अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत तुळशीराम विश्वनाथराव बागलाने यांची वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी सदर प्रकरणात पुढील तारीख २३/०७/२०२५ आहे.

आज दिनांक १६/०६/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिले.

**स्वाक्षरीत**
**क. लिपिक सह दिवाणी न्यायालय व स्तर बीड**

**आदेशावरून**
**स्वाक्षरीत**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व स्तर,बीड**

## क्रांतिज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेकडून ४५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गणवेश वाटप

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील क्रांतिज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेकडून डॉ.राम भालचंद्र माध्यमिक विद्यालयातील ४५ विद्यार्थ्यांना शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी शालेय साहित्य व गणवेश वाटप करण्यात आले.

शहरालगत असलेल्या परिसरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणाऱ्या डॉ.राम भालचंद्र माध्यमिक विद्यालयात क्रांतिज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेकडून शालेय साहित्य व गणवेश वाटपाचा कार्यक्रम सोमवार, दिनांक १६ जुन २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक सुनिल आवाड तर प्रमुख अतिथी म्हणून नारायणराव हारेगांवकर (अध्यक्ष, कोष्टी समाज संघटना, अंबाजोगाई.), क्रांतिज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे सचिव राम वसंतराव घोडके, युवक नाभिक महासंघ शाखा



अंबाजोगाईचे अध्यक्ष बालाजी वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते कमलाकर (अंकुश) हेडे, सामाजिक कार्यकर्ते अंकुशराव घोडके, अमोल राऊत या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नारायणराव हारेगांवकर, बालाजी वाघमारे यांनी समायोचित मनोगत व्यक्त केले. तर अध्यक्षीय समारोप सुनिल आवाड यांनी केला. या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संस्थेचे सचिव राम घोडके म्हणाले की, शालेय गणवेश आणि शैक्षणिक साहित्य वाटप हा विद्यार्थ्यांसाठी एक महत्वाचा कार्यक्रम आहे. अनेक शाळा आणि सामाजिक संस्था विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि त्यांना शिक्षणामध्ये समान संधी मिळावी यासाठी हे वाटप करतात. शालेय गणवेशामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक समानता आणि आपलेपणाची भावना येते. शिक्षण विभागातर्फे पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत गणवेश योजना राबविली जाते. असे असले तरी बांधिलकी म्हणून काही शाळांमध्ये क्रांतिज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था या सारख्या सामाजिक संस्थांच्या मदतीने गरजू विद्यार्थ्यांना गणवेश दिले जातात. गणवेशामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि ते अधिक उत्साहाने शाळेत येतात. शालेय साहित्यामध्ये वह्या, पुस्तके, कंपास पेटी, पेन्सिल, आणि इतर शैक्षणिक साहित्य यांचा समावेश असतो. या साहित्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासात मदत होते आणि त्यांची शैक्षणिक प्रगती चांगली होते. गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळाल्याने त्यांच्या पालकांवरील आर्थिक भार कमी होतो. गणवेश आणि शैक्षणिक साहित्य वाटप केल्याने विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवता येतात. यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये चांगली संधी मिळते आणि त्यांचे भविष्य उज्ज्वल होण्यास मदत होते असे सचिव घोडके यांनी सांगितले. सुत्रसंचालन मनोज शिंदे यांनी केले तर उपस्थितांचे आभार खमरोद्दीन शेख यांनी मानले. तर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी क्रांतिज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या सर्व पदाधिकारी पदाधिकारी व सदस्य यांनी पुढाकार घेतला.

cmyk

राज्य लोकतंत्र शेत-शिवार
मंगळवार, दि. १७ जुन २०२५
४

# कांद्याच्या दरात चढ-उतार

## मका स्थिर, मिरचीचे दर तेजीत, तर दोडका महागला

मक्याचा बाजार मागील काही दिवसांपासून स्थिर आहे. बाजारातील मक्याची आवक सध्या कमी झाली. मात्र, यंदा मक्याचे उत्पादन वाढले आहे. तसेच वाढलेल्या दरात आयात वाढण्याचाही धोका आहे. मक्याचा स्टॉकही आहे. त्यामुळे मक्याचे भाव स्थिर आहेत. सध्या देशात मक्याला सरासरी २ हजार ते २ हजार २०० रुपयांच्या दरम्यान भाव मिळत आहे. चालू खरिपातही मक्याची लागवड वाढण्याचा अंदाज आहे. मात्र दुसरीकडे मक्याला इथेनॉलसाठी चांगली मागणी आहे. यामुळे पुढील काळात मक्याच्या दरात २०० ते ३०० रुपयांपर्यंत सुधारणा अपेक्षित आहे, असे मका बाजारातील अभ्यासकांनी सांगितले.

हिरवी मिरची तेजीतच : राज्यातील बाजारात मागील काही आठवड्यांपासून हिरव्या मिरचीची आवक कमीच आहे. तर दुसरीकडे मागणी आहे. त्यामुळे दरही स्थिर दिसत आहेत. सध्या लग्न सराई आणि समारंभामुळे हिरव्या मिरचीला चांगला उठाव आहे. त्यामुळे हिरवी मिरची ३ हजार ते ३ हजार ५०० रुपयाने विकली जात आहे. हिरव्या मिरचीची आवक आणखी काही आठवडे वाढण्याची शक्यता नाही. त्यामुळे बाजारातील आवकही सरासरी राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे



हिरव्या मिरचीचे दरही पुढील काही आठवडे कायम राहू शकतात, असा अंदाज व्यापारी व्यक्त करत आहेत.

दोडका आवक घटली : बाजारीत दोडक्याची आवक मोठ्या प्रमाणात कमी झाली. तर दोडक्याला चांगला उठाव आहे. त्यामुळे दोडक्याच्या भावातही सुधारणा दिसून आली. दोडका पिकालाही सततचा पाऊस आणि ढगाळ हवामानाचा फटका बसत आहे. पिकाचे मोठे नुकसान झाल्याचे शेतकरी सांगत आहेत. आवक कमी आणि चांगली मागणी यामुळे दोडक्याचा बाजार ४ हजार ते ५ हजार रुपये प्रतिक्विंटलच्या दरम्यान पोचला. दोडक्याची आवक आणखी काही आठवडे कमीच राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे दरही टिकून राहतील, असा अंदाज व्यापारी व्यक्त करत आहेत.

गुळाचे भाव टिकून : देशात यंदा उसाचे उत्पादन कमी झाले. कारखान्यांनाही उसाची टंचाई भासत होती. गुऱ्हाळांनाही यंदा ऊस कमी मिळाल्याचे गुऱ्हाळचालकांनी सांगितले. याचा परिणाम गूळ उत्पादनावर झाला. गेल्यावर्षीपेक्षा यंदाचे गुळाचे उत्पादन कमी असल्याचे व्यापारी सांगत आहेत. त्यामुळे गुळाचे भाव टिकून आहेत. सध्या गुळाला गुणवत्तेप्रमाणे राज्यातील बाजारात ४ हजार ते ४ हजार ५०० रुपयांच्या दरम्यान भाव मिळत आहे. यापुढील काळात गुळाला मागणी वाढत जाऊन दरालाही आधार मिळू शकतो, असा अंदाज गूळ बाजारातील व्यापारी व्यक्त करत आहेत.

कांदा दरात चढ उतार : कांदा दरात काहीसे चढ उतार आहेत. सरासरी दरपातळी काही कमी झालेली दिसत आहे. राज्यातील काही भागात पावसामुळे कांदा आवक काहीशी प्रभावित होत असल्याचे व्यापारी सांगत आहेत. तर बाजारात आजही गुणवत्तापूर्ण मालाची कमतरता असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

त्यामुळे गुणवत्ता कमी असलेल्या मालाचे भाव काहीसे नरमले आहेत. सध्या कांद्याचा राज्यापतळीवरचा सरासरी दर १२०० ते १५०० रुपयांवर आला आहे. पुढील काही दिवस बाजारातील ही परिस्थिती कायम राहू शकते. आवक आणि दरात काहीसे चढ उतार राहतील, असे अभ्यासकांनी सांगितले.

## टोमॅटो वरील फळ पोखरणाऱ्या अळीचे नियंत्रण

राज्यात टोमॅटो या फळभाजी पिकावर फळ पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव आढळून येतो आहे. तज्ञांच्या म्हणण्यानुसार टोमॅटोवर बर्याच ठिकाणी फळ पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येतो. ढगाळ वातावरण यासाठी कारणीभूत आहे.

या कीटकनाशकांचा करा वापर :

इनडोकझाकार्ब (१४.५ एससी) ०.८मिली / फ्लूबेंडीआमईड (टाकुमी) (२० डब्लूजी) ०.५ग्रॅम / नोव्हाल्यू रॉन (१०ईसी) ०.७५ मिली / कोराजन (१८.५ एससी) ०.३ मिली. बायोलॉजिकल उपाय म्हणून पाच टक्के निंबोळी अर्क किंवा कडुनिंब आधारित आझाडिरेक्टिन (३००पिपीएम) २ मिली प्रति लिटर प्रमाणे फवारणी करावी. बी. टी जिवाणूजन्य कीटकनाशक दोन ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात करावी. याबरोबरच लागवड करताना मुख्य पिकाच्या कडेने मका व चवळी लागवड करावी तसेच झेंडूची लागवड केली तरी फायद्याचे ठरते. लागवडीनंतर ४० ४५ दिवसांनी शेतात टायको ग्राम चीलोनिस हे मित्रकीटक एक लाख प्रति हेक्टरी या प्रमाणात सात दिवसांच्या अंतराने दोन ते तीन वेळा सोडा. हे कीटक फळे पोखरणाऱ्या किडीची अंडी शोधून त्यात स्वतःची अंडी घालतात परिणामी फळ पोखरणारी कीड अंडी अवस्थेतच नष्ट होतात. शेतात एकरी पाच या प्रमाणात कामगंध सापळे लावावे. किडलेली फळे काढून खोल खड्ड्यात गाडून टाकावीत.



## कोंबड्यातील प्राणघातक 'मानमोडी' आजार

### वेळीच करा नियंत्रण उपाय!

कोंबड्यांना होणारा मानमोडी हा संसर्गजन्य आजार असून यामुळे कुक्कुटपालन व्यवसायाचे अर्थशास्त्र कोलमडून पडते. या रोगामध्ये पक्षांच्या मृत्युचे प्रमाण ५० ते १०० टक्के असते. हे नुकसान टाळायचे असल्यास हा रोग होऊ नये म्हणून प्रतिबंधक उपाय करणे गरजेचे असते. यासाठी लसीकरण हा सर्वात चांगला पर्याय आहे. जाणून घेऊ या रोगाची लक्षणे आणि यावरील उपाय.

मानमोडी आजाराची कारणे : मानमोडी हा रोग पॅरामिक्सो विषाणूंमुळे होतो. हे विषाणू पक्ष्यांचे श्वसनेंद्रिय, पचनसंस्था, मज्जासंस्था व यकृत यांसारख्या अवयवांवर परिणाम करतात.

या रोगाचा प्रसार हवेद्वारे, आजारी पक्ष्यांच्या विष्ठेद्वारा व श्वसना द्वारे होतो. आजारी पक्ष्यांमुळे पक्षी घरातील वातावरण, उपकरणे व काम करणाऱ्यांच्या कपड्यांवर हे विषाणू मोठ्या प्रमाणात जमा होतात. हे विषाणू वातावरणात बराच वेळ टिकून राहतात. दूषित खाद्य व पाणी, मेलेले पक्षी उघड्यावर टाकणे, लिटर, अंडी उबवणूक यंत्र, इ. पासून या रोगाचा प्रसार होतो. इतर जातींच्या पक्ष्यांना सुद्धा हा रोग होतो व हे पक्षी रोगप्रसारास कारणीभूत ठरतात.

मानमोडी आजाराची लक्षणे : या रोगाची लक्षणे, मृत्यूचे प्रमाण, तीव्रता ही विषाणूंचा प्रकार, पक्ष्यांचे वय, लसीकरण, रोगप्रतिकारक शक्ती, साथ, वातावरण व व्यवस्थापन यावर अवलंबून असतात. मोठ्या पक्ष्यांमध्ये अधिकाधिक पक्षी एका रात्रीत आजारी पडतात. पक्ष्यांना पाण्यासारखी हिरवट रंगाची संडास होते, पंख व पाय अधू होतात. मान



वाकडी होते. अंडी देण्याचे प्रमाण घटते. कवच मऊ होते व अंड्याचा आकार बदलतो तसेच पांढरा बलक पाण्यासारखा पातळ होतो. श्वास घेताना मोठा आवाज होतो. तोंडाने श्वासोच्छवास करतात. लहान पिलांमध्ये हा तीव्र स्वरुपाचा आजार असून श्वसनाची व मज्जासंस्थेची लक्षणे दिसून येतात, पिल्ले व तलंग सुस्त व अशक्त दिसतात. पक्ष्यांना चालता येत नाही, थरथर कापतात व लंगडतात. डोळा आणि गळ्याला सुज येते.

उपचार : या रोगावर परिणामकारक उपचार उपलब्ध नाही, परंतु या रोगानंतर होणाऱ्या जिवाणूजन्य रोगांवर उपचार म्हणून प्रतिजैविकांचा वापर करण्यात येतो. आजारी पक्षी वेगळे काढावे. मृत पक्ष्यांना जाळून टाकावे. दूषित पाणी व खाद्य नष्ट करावे. ऑल इन ऑल आऊट व्यवस्थापन पद्धत राबवावी. शेडचे फ्युमीगेशन (३० मि.लि. फॉर्मेलीन व २० ग्रॅम पोटॅशिअम परमँगनेट) करावे.लसीकरण : पिल्ले आणल्यानंतर सहाव्या दिवशी लासोटा लस डोळ्यांतून एक थेंब द्यावी व त्यानंतर बूस्टर डोस सहाव्या आठवड्यात पाण्यातून देऊन लसीकरण करावे. अंडी देणाऱ्या पक्ष्यांमध्ये दर सहा आठवड्यांनी पाण्यातून लसीकरण करावे. लस सहाव्या आठवड्यात व बूस्टर डोस १५ व्या आठवड्यात इंजेक्शनद्वारे पंखाखाली द्यावी. पक्ष्यांना लसीकरणापूर्वी दोन ते तीन दिवस आधी पाण्यातून जंतनाशक औषध द्यावे.

## नवीन फळबागेचे नियोजन; जाणून घ्या योग्य पद्धत

राज्यामध्ये सन १९९०-९१ पासून रोजगार हमी अंतर्गत १०० टक्के अनुदानित फळझाड लागवड ही महत्त्वाकांक्षी योजना सुरु झाली. तेंव्हा पासून फळबाग लागवडीची संकल्पना राज्यातील शेतकऱ्यांच्या मनावर रुजली. फळबाग लागवडीची संकल्पना राज्यातील पडीक जमिनीला मिळालेले वरदान ठरल, अस म्हटल तर वावग ठरू नये.राज्यात आता पर्यंत ३० लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावर फळबागा उभ्या आहेत. परंतु अद्याप फळबाग लागवडीमध्ये अपेक्षित असे यश मिळालेले नाही हि वस्तूस्थिती आहे. अशा परिस्थितीत फळबाग लागवड यशस्वी होण्यासाठी ''फळबाग लागवडीची पूर्वतयारी आणि नियोजन'' या महत्वाच्या बाबी आहेत.

फळबागेच्या यशस्वी लागवडीकरिता महत्वाच्या बाबी :

आपल्याकडे जमीन कोणत्या प्रकारची आहे?अ पल्या जमिनीत फळझाडे येतील का?बारमाही पाण्याची व्यवस्था आपल्याकडे आहे का?आपल्या हवामानात फळझाडे कोणत्या प्रकारची येऊ शकतील? मातीची व पाण्याची तपासणी केली आहे काय?बागेसाठी उत्तम जातीवंत कलमे कोठून उपलब्ध होऊ शकतील?जी बाग आपण लावणार आहोत त्यास बाजारपेठ उपलब्ध आहे काय?प्रक्रिया उद्योग आहेत काय? अशा सर्व बाबींचा विचार केल्यानंतरच आपणास कोणती फळझाडे लावायला हवीत याचा विचार करणे महत्वाचे ठरते. फळबाग म्हणजे ५ ते ६ महिन्याच्या पिकांच्या मशागतीची गोष्ट नसते, तो एक दिर्घकाळ चालणारा व्यवसायाच म्हणायला हरकत नाही. फळबागेसाठी जमिनीची निवड करताना तिचा निचरा



उत्तम असणे आवश्यक आहे. फळबागेसाठी कमीत कमी १ मीटर खोलीनंतर मुरमाचा थर असणारी जमिन निवडावी. भरपूर सेंद्रिय कर्ब असणारी, भुसभुशीत,मध्यम पोताची जमिनीचा सामू ६ ते ७.५ पर्यंत असावा. मुक्त चुनखडीचे प्रमाण १० टक्क्यापेक्षा कमी असावे.

फळबागेसाठी पाण्याची उपलब्धता :

बागायती फळझाडांना नियमित पाणी द्यावे लागते,अशा बागायती फळझाडांची लागवड करताना कितपत पाणीपुरवठा पुरेल किंवा पाण्याची उपलब्धता किती आहे, याचा विचार करूनच नियोजन करावे. कोरडवाहू फळपिकांना लागवडीच्या सुरुवातीस पहिली तीन ते चार वर्ष पाण्याची, चांगल्या व समाधानकारक वाढीसाठी पाण्याची आवश्यकता असते. ज्या फळझाडांना बाराही महिने पाणी लागते अशा फळझाडांची निवड करावी. आपल्याला पाणी आठ महिने पुरत असेल तर पेरू सारखी फळझाडे लावावीत. इआपले पाणी फक्त सहा महिने पुरत असेल तर सीताफळ, रामफळ, आवळा, बोर या सारखी कोरडवाहू फळझाडांची लागवड करावी.

हवामानानुसार फळपिकांची लागवड :

महाराष्ट्रातील शेतकरी या बाबतीत खरोखरच भाग्यवान आहेत, कारण आपल्या राज्यात सफरचंद वगळता बहुतेक फळझाडांची यशस्वी लागवड करता येते.

कारण आपल्या राज्यातील हवामान फळबाग लागवडीसाठी खुपच अनुकूल आहे.यामुळे हवामांनाच्या बाबतीत फळबाग लागवड करताना शेतकऱ्यांना फारसा विचार करावा लागत नाही.आपल्या राज्याचा विचार करता पश्चिम महाराष्ट्रात आंबा, केळी, चिकू, पपई, नारळ अशा प्रकारची फळझाडे घ्यावीत.पूर्वेकडील उष्ण व कोरड्या हवामानात संत्रा, मोसंबी, कागदी लिंबू, पेरू, द्राक्षे, डाळिंब यासारखी फळझाडे घ्यावीत.कोकणसारख्या अति पावसाच्या भागात चिकू, नारळ, फणस, आंबा काजू यासारखी फळझाडे घ्यावीत.अति कमी पावसाच्या भागात बोर, सीताफळ, आवळा, चिंच अशी कोरडवाहू फळझाडे घ्यावीत.

वाहतुकीच्या दृष्टीने फळबागेचे ठिकाण :

जमिनीचे वाहतुकीच्या दृष्टीने स्थान अत्यंत महत्वाचे आहे. आपली जमीन वाहतुकीच्या रस्त्यापासून दूर असेल तर बागेला लागणारे साहित्य जागेवर पोहोचविणे; फळे वाहतुकीच्या सोयीच्या जाग्यावर आणणे याचा खर्च वाढतो.अनेकदा शेतकरी भावनेच्या भरत भलत्याच जागी फळबाग लावतात आणि साहित्य व फळे मजुरांच्या डोक्यावर वाहून नेण्याचा खर्च प्रचंड वाढून बागेतून फायदा काही हाती लागत नाही.त्यामुळे सुरुवातीलाच वाहतुकीच्या दृष्टीने नियोजन करण आवश्यक आहे.

फळबाग यशस्वी करण्यासाठी महत्वाच्या टिप्स

जमिनीची निवड,हवामानानुसार फळझाडांची लागवड,पाण्याची उपलब्धता,फळबागेची आखणी, योग्य कलमांची निवड, लागवडीची योग्य वेळ आणि लागवड केलेल्या रोपांची काळजी,या सर्व बाबी लक्षात घेऊन योग्य नियोजन केल्यासं फळबाग नक्कीच फायद्याची ठरेल.अत्याधुनिक तंत्रज्ञान,व्यापक दुरद्रष्टी, उच्चध्येये, ती प्रत्यक्ष साकारण्यासाठी प्रयत्न अभ्यासाची पराकाष्टा, उद्योजक वृत्ती या बाबी केंद्रस्थानी ठेवल्या तर निश्चितच आपली फळबाग रोल मॉडेल्? ठरेल यात शंका नाही.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६३२ : मुघल बादशाह शहाजहान याची पत्नी मुमताज हिचे निधन. तिच्या स्मरणार्थ शहाजहान याने आग्रा येथे ताजमहलची निर्मिती केली.
१७९९ : फ्रांस सम्राट नेपोलियन बोनापार्ट यांनी इटली देश आपल्या साम्राज्यात सामावून घेतला.
१८८५ : न्यू यॉर्क बंदरमध्ये स्टॅच्यू ऑफ लिबर्टी चे आगमन झाले.
१९१७ : महात्मा गांधी आणि कस्तुरबा गांधी हे साबरमती आश्रमातील हृदय कुंज या टिकाणी रहायला गेले.
१९२९ : सोवियत संघाने चीन बरोबर असणारे आपले राजनैतिक संबंध संपुष्टात आणले.
१९३३ : सविनय कायदेभंग चळवळ मागे घेण्यात आली
१९४० : दुसरे महायुद्ध दोस्त राष्ट्रांनी फ्रान्समधुन माघार घेण्यास सुरूवात केली.
१९४४ : आइसलँडने (डेन्मार्कपासुन) स्वातंत्र्य घोषित केले आणि ते प्रजासत्ताक बनले.
१९४४ : जर्मनीने दुसऱ्या महायुद्धात हार मानली
१९६३ : अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने सार्वजनिक शाळांतून बायबलचे पठण करणे कायदेबाह्य ठरवले.
१९६७ : चीनने पहिल्या हायड्रोजन बॉम्बचा स्फोट केला.
१९७० : शिकागोत पहिल्यांदाच किडनी ट्रान्सप्लॅन्टची शस्त्रक्रिया करण्यात आली
१९७२ : वॉटरगेट कुभांड डेमोक्रॅटिक पक्षाचे कार्यालय फोडून कागदपत्रे पळवल्याबद्दल रिचर्ड निक्सनच्या चार साथीदारांना अटक.
१९९१ : भारताचे पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल आणि पंतप्रधान राजीव गांधी यांना मरणोत्तर 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर
२००४ : मंगळावर पृथ्वीप्रमाणेच दगड सापडले.
२००८ : 'तेजस' विमानाची पहिल्यांदाच यशस्वी चाचणी करण्यात आली.
२०१२ : भारतीय बॅडमिंटनपटू सायना नेहवाल यांनी इंडोनेशिया ओपन स्पर्धा तिसऱ्यांदा जिंकली.
२०१३ : भारताच्या उत्तराखंड राज्यात ढगफुटी होऊन एका दिवसात १३ इंच पाऊस पडला. शेकडो व्यक्ती मृत्युमुखी, हजारो यात्रेकरी अडकले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२३९ : एडवर्ड (पहिला) इंग्लंडचा राजा (मृत्यू: ७ जुलै १३०७)
१७०४ : फ्लाइंग शटल चे शोधक जॉन के यांचा जन्म.
१८६७ : लघुलेखन पद्धतीचा शोधक जॉनरॉबर्ट ग्रेग यांचा जन्म.
१८८७ : प्रख्यात भारतीय राजकारणी, मध्य प्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय गृहमंत्री आणि केंद्रीय संरक्षणमंत्री तसचं, पश्चिम बंगाल व ओरिसा राज्याचे माजी राज्यपाल कैलाशनाथ काटजू यांचा जन्मदिन.
१८९८ : जर्मन भौतिकशास्त्रज्ञ कार्ल हेर्मान यांचा जन्म.
१९०३ : बाबूराव विजापुरे संगीतशिक्षक? (मृत्यू: ७ डिसेंबर १९८२)
१९०३ : चॉकोलेट चिप कुकी चे निर्माते रुथ ग्रेव्हस वेकफिल्ड यांचा जन्म. (मृत्यू: १० जानेवारी १९७७)
१९२० : नोबेल पारितोषिक विजेता फ्रेंच जीवशास्त्रज्ञ फ्रांस्वा जेकब यांचा जन्म.
१९७३ : लिअँडर पेस भारतीय टेनिसपटू
१९८० : महान अमेरिकन व्यावसायिक टेनिसपटू वीनस विलियम्स यांचा जन्मदिन.
१९८१ : शेन वॉटसन ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२९७ : ज्येष्ठ गुरु संत श्री निवृत्तीनाथ महाराज यांनी त्र्यंबकेश्वर येथे देह ठेवला. (जन्म: २९ जानेवारी १२७४)
१६३१ : शाहजहानची पत्नी मुमताज महल यांचे निधन. (जन्म: २७ एप्रिल १५९३)
१६७४ : राजमाता जिजाबाई (छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री) (जन्म: १२ जानेवारी १५९८)
१८५८ : झाशीच्या राणी लक्ष्मीबाई इंग्रजांच्या विरूद्ध चकमकीत धारातीर्थी.
१८३९ : ब्रिटीश कालीन भारताचे १४ वे गव्हर्नर जनरल(राज्यपाल) लॉर्ड विलियम बेटिंक यांचे निधन.
१८६५ : ब्रिटीश कालीन भारतातील ब्रिटीश गव्हर्नर जनरल लॉर्ड कॅनिंग यांचे निधन.
१८९३ : भारताचे १४ वे राज्यपाल जनरल लॉर्ड विल्यम बेंटिंक यांचे निधन. (जन्म: १४ सप्टेंबर १७७४)
१८९५ : गोपाळ गणेश आगरकर लोकमान्य टिळकांचे सहकारी व 'केसरी'चे पहिले संपादक, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे एक संस्थापक व फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य, समाजसुधारक, विचारवंत व शिक्षणतज्ञ, 'सुधारक' या वृत्तपत्राचे संस्थापक व संपादक (जन्म: १४ जुलै १८५६)
१९२८ : पण्डित गोपबंधूदास तथा 'उत्कलमणी' ओरिसातील समाजसुधारक, सामाजिक कार्यकर्ते, स्वातंत्र्यसेनानी, कवी व लेखक (जन्म: ९ आक्टोबर १८७७)
१९६५ : मोतीलाल राजवंश ऊर्फ 'मोतीलाल' आपल्या ऐटबाज व्यक्तिमत्त्वाने व सहजसुंदर अभिनयाने रसिकांवर मोहिनी घालणारे अभिनेते (जन्म: ४ डिसेंबर १९१०)
१९८३ : शरद पिळगावकर चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व वितरक (जन्म: )
१९९६ : मधुकर दत्तात्रय तथा 'बाळासाहेब' देवरस राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तिसरे सरसंघचालक (जन्म: ११ डिसेंबर १९१५)
२००४ : इंदुमती पारीख, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या.

# माजलगाव उपविभागीय अधिकारी कार्यालयाचा अजब कारभार

## उपोषणकर्त्यांची घेतली जात नाही दखल

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव उपविभागीय कार्यालय येथील उपविभागीय अधिकारी यांना निवेदन करते व तक्रारदार यांच्या तक्रार निवारणासाठी वेळच नसतो, निवेदन देऊन व वरिष्ठांचे आदेश असताना देखील कारवाईस या कार्यालयाकडून दिरंगाई होते यामुळे वारंवार या कार्यालयाचे खेटे मारण्याची वेळ सामान्यावर व नागरिकांवर येत आहे.

याबाबत थोडक्यात माहिती अशी की, तालुक्यातील पात्रुड येतील गट नंबर १०६ ही जमीन श्रीराम मंदिर बीड या नावाने असून या जमिनीवर बेकायदेशीरपणे खरेदी-विक्रीचे रॅकेट चालू असून बेकायदेशीर खरेदी विक्री करणाऱ्या वर व अतिक्रमण धारकावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे यासाठी माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने निवेदन देण्यात आले होते. या निवेदनातील मागण्याची दखल घेत मा. जिल्हाधिकारी बीड यांनी दि. २२ एप्रिल २०२५ रोजी च्या बेमुदत धरणे आंदोलनास




शासन नियमानुसार आवश्यक ती कारवाई करण्यात येईल असे तक्रारदारांना व निवेदनकर्त्यांना अवगत करत उपोषणापासून परावृत्त केले होते. परंतु यावर कुठल्याही प्रकारची कारवाई केली न गेल्यामुळे दि. २६ मे २०२५ रोजी या प्रकरणाची दखल न घेतल्यामुळे उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना या संदर्भात निवेदन देत माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने याप्रकरणी दि.१६ जुन सोमवार रोजी बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता परंतु पात्रुड येथील सर्वे नं/ गट नं. १०६ मधील ४ हे.७१ आर. या जमिनीवर श्रीरंग मारुती बारवकर या व्यक्तीने एक बोरवेल पाडून त्याचा फेरफार आपल्या नावावर लावून या जमिनीवर अतिक्रमण केलेले आहे.ही अतिक्रमणित जागा हा व्यक्ती प्लॉटिंगच्या नावावर बेकायदेशीरपणे विक्री करत आहे. त्यामुळे अतिक्रमण धारकांना व खरेदी विक्री करणाऱ्या वर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात यावेत, असे निवेदन देण्यात आलेले होते परंतु आज तगायत याप्रकरणी अतिक्रमण धारकांना व बेकायदेशीर विक्री करणाऱ्या व घेणाऱ्या वर कसल्याही प्रकारची कारवाई उपविभागीय अधिकारी माजलगाव यांच्याकडून केली गेली नसल्यामुळे दि.१६ जुन सोमवार रोजी पासून माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने उपविभागीय कार्यालया समोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येत आहे.

याप्रकरणी लवकरात लवकर कारवाई न केल्यास आंदोलन हे चालूच राहणार आहे असे तक्रारदारांच्या वतीने सांगण्यात आली आहे.

# अंथरवण पिंपरी,गावात कृषि दुतांचे आगमन



बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी संलग्नित व आदित्य शिक्षण संस्था, बीड संचलित आदित्य कृषि महाविद्यालयाचे कृषिदूत सुनील मदने, बाबासाहेब पल्हाल , सचिन धुमाळ, गणेश ढोले, दयानंद सिरसट,योगेश मोरे, रेहान सय्यद, संदीप करडकर, श्रीदीप वलेकर, धीरज पवार यांचे ग्रामीण कृषि कार्यानुभव आणि कृषि औद्योगिक संलग्नता उपक्रम २०२५-२६ च्या अभ्यास दौऱ्यानिमित्ताने अंथरवन पिंपरी या गावामध्ये आगमन झाले. अंथरवन पिंपरी येथील सरपंच व ग्रामस्थांनी कृषिदूतांचे स्वागत केले. या अभ्यासदौऱ्या दरम्यान कृषिदूतांनी शेतकऱ्यांना शेती विषयक शास्त्रीय माहिती, हंगामा प्रमाणे पीक पद्धती, रासायनिक खतांचा योग्य वापर, कीटकनाशके फवारताना घ्यायची काळजी, कीटकनाशक आणि सेंद्रिय शेती याबद्दल माहिती दिली. या अभ्यासदौऱ्याचा कालावधी अडीच महिन्यांचा असून यादरम्यान माती परीक्षण, पाणी व्यवस्थापन, कीडरोग पिक संरक्षण याबाबत प्रात्यक्षिके घेतली जातील. कृषिदूतांचे आगमनावेळी गावचे सरपंच शिवगंगा भाऊराव प्रभाळे व उपसरपंच अशोक बंसिदर शिंदे इतर ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते. या अभ्यासादौऱ्यास विद्यार्थ्यांना आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. आदितीजी सारडा यांचे विशेष मार्गदर्शन लाभत आहे. तसेच आदित्य कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा, कार्यक्रम समन्वय प्रा. वैभव शिंदे, कार्यक्रम अधिकारी डॉ. धनंजय सातपुते, महाविद्यालयातील इतर सर्व प्राध्यापक वर्ग आणि विषयक तज्ञांच्या मार्गदर्शनखाली हा कार्यक्रम पार पडत आहे

## थोडक्यात



### केएसपी विद्यालयातील विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन जल्लोषात स्वागत

बीड। प्रतिनिधी

रोजी शाळेतील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील पहिल्या दिवशी मुलांना गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. मुलांना शाळेबदल गोडी निर्माण व्हावी, मुलांना शाळेबदलची भिती दूर व्हावी, शिक्षणाची आवड निर्माण व्हावी, या हेतुने मुलांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. शाळेच्या प्रांगणात फुग्याची कमान लावून, ढोल ताशामध्ये मुलांचे स्वागत करण्यात आले. सर्व मुले नवीन वर्गात प्रवेश करतात या निमित्ताने सर्व वर्गाची सजावट करण्यात आली. सौ.अंजलीताई शेळके, श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख, यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन, मुलांना चालू शैक्षणिक वर्षाचे पुस्तके वितरीत करण्यात आली. तसेच मुलांना पुढील शैक्षणिक वर्षाकरिता मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्व विद्यार्थ्यांचा आनंद व्दिगुणी होता.या स्वागत उत्सवाकरिता शाळेचे प्रा. मुख्याध्यापक विशाल सुपेकर, तसेच शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मुलांचे स्वागत करुन त्यांना शुभेच्छा दिल्या.

### दासखेड येथे पवनचक्कीचे ५० लाखाचे कॉपर केबल चोरीला

पाटोदा । प्रतिनिधी

दासखेड परिसरातील घटना पाटोदा तालुक्यातील दासखेड शिवारात असलेल्या पवनचक्कीच्या कॉपर केबलची व इतर साहित्याची चोरी झाली आहे चोरट्याने जवळपास ५० लाखाचे केबल चोरून नेले या प्रकरणी आज्ञा चोरट्या विरोधात पाटोदा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे पाटोदा तालुक्यातील असलेल्या दासखेड शिवारात पवनचक्की क्रमांक एस एस पी आय २२ चे कर्शपर धातूचे साहित्य असा एकूण पन्नास लाखाचा मुद्देमाल चोरट्याने चोरून नेला आहे सदरील. चोरीला गेल्याचे सुरक्षारक्षक कल्याण कोकाटे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी याबाबत पाटोदा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे



**बीड: जिल्हा परिषद कन्या शाळा पली येथे पहिलीच्या मुलीचा प्रवेश उत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी रविंद्र भालेकर, शेख निजाम, नवले नवनाथ, केंद्रीय मुख्याध्यापक शेळके, केंद्रप्रमुख प्रकाश अहिरे, खेडकर, आठवले, भारते, जाधव उपस्थित होते.**

# पाटोदा येथे शेतकऱ्यांच्या तेतीस गायी पकडल्या पोलिसांनी

पाटोदा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील काष्टी येथून जनावराची खरेदी करून परतणाऱ्या शेतकऱ्यावर पाटोदा पोलिसांनी कारवाई करत तेथे जनावरे ताब्यात घेत कोणती चौकशी न करता किंवा संसदेच्या आधारे पोलिसांनी गाड्यावरून जनावरे ठाण्यात नेली यादरम्यान एका गाईची प्रसूती पोलीस ठाण्यातच झाली तातडीने पशुवैद्यकीय अधिकारी बळीराम राख यांना प्राचार्य करण्यात आले त्यांनी सर्व जनावरचे तपासणी केली हा गोंधळ सुरू असतानाच काही शेतकऱ्यांनी यांना ही माहिती दिली.

याबद्दल त्यांनी जनावर शेतकऱ्यांची असल्याची खात्री पटत असता तरी पाटोदा पोलिसांना संपर्क करून चांगलेच पाहिल्यावर घेतले पोलिसांनी क्षमतेपेक्षा जास्त जनावराची वाहतूक केलेल्या प्रकरणी चार गाडी मालकावर गुन्हा नोंदवला शनिवारी रोजी शेतकऱ्यांनी काष्टीच्या आठवणी बाजारातून जाणारे अधिकृत उमेदवारी घेतली होती ही जनावर घेऊ शेतकरी पाठवता मार्ग आपल्या गावी करत असताना पोलिसांना बेकायदेशीर वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली कुलस्वामी चार वाणी त्यातील ३२ जनावर येथे पोलिस ठाण्यात आलेली या प्रकरणी कारवाई झाल्यामुळे शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागल पाटोदा पोलीस ठाण्याचे एपीआय तागड म्हणाले अनेक वेळा विविध वाहतूक केली जाते तसेच प्रकारची माहिती मिळाली होती त्यामुळे आम्ही या गाड्या पोलीस ठाण्यात आणल्या आम्ही योग्य ती तपासणी करून खात्री करून सर्व जनावराची सुटका केली.

# गुजर समाजाच्या नवनियुक्त कर्मचाऱ्यांचा सत्कार

बीड। प्रतिनिधी

गुजर समाज देवसेनेकडून दि.१५. जून २०२५ रोजी शहरातील पवनसुत मंगल कार्यालय बीड या ठिकाणी गुजर समाजाच्या नवनियुक्त कर्मचार्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी मान्यवर म्हणून गुजर समाज देवसेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांच्यासह गुजर समाज सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ गुजर, जिल्हा उपाध्यक्ष युवराज बहिरवाळ. व ज्ञानेश्वर महाराज मंजिरीकर, अंबादास गुजर शिवाजी घोशीर, राहुल डोंगर, विक्रम डोंगर, देवसेनेचे प्रसिद्धीप्रमुख राजेंद्र गुजर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.



या प्रसंगी गुजर समाज देवसेनेचे जिल्हाध्यक्षरतन गुजर म्हणाले की गुजर समाजाच्या कर्मचार्याला जर कोणी त्रास दिला तर याद राखा गाठ आमच्याशी आहे. गुजर समाजाच्या कर्मचार्यांनी आपले काम वेळेवर, शिस्तीत राहून, कोणालाही त्रास न होता अखंड रितीने करत रहावे जर तुम्हाला कोणी त्रास दिला तर आम्ही आहोत नियमाने तुमच्यासाठी लढा देवू. कोणी जाणीवपूर्वक त्रास देत असेल तर आमच्याशी संपर्क करा समाजाचे जिल्हाध्यक्ष म्हणून आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत यावेळी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांचे पहिले गुरु आई-वडील असतात आणि त्यानंतर त्यांना समाजाचे ऋण फेडावे लागते त्यामुळे आई-वडील आणि समाजाला कधीही विसरु नका असे ते म्हणाले. यावेळी गुजर समाजाचे बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.सहर्ष घोलप वैद्यकीय मदत कक्षाच्या राज्य कार्यकारणीवर

जामखेड। प्रतिनिधी

अनेक वर्षापासून आरोग्य क्षेत्रामध्ये डॉ.सहर्ष घोलप हे काम करत आहेत. अनेक गोरगरीब गरजूवंतांना त्यांच्या माध्यमातून योग्य तो उपचार व मार्गदर्शन मिळून शासनाच्या निधी मिळणे पर्यंत सहकार्य केले आहे. या सर्वांची दखल घेऊन शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष च्या राज्य कार्यकारिणी सदस्य पदी त्यांची निवड करण्यात आली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या संकल्पनेतून सुरू झालेले शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आज महाराष्ट्रामध्ये गोरगरीब, दिन दुबळ्यांच्या मदतीला धावणारा आरोग्य क्षेत्रातील महत्त्वाचं असलेलं एक महत्त्वाचं ठिकाण आहे.

**आरोग्य क्षेत्रातून केलेल्या जनसेवेच फळ डॉ.सहर्ष घोलप यांना मिळालं!**



इथे गोरगरीब, गरजवंत, आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना हक्काचा उपचार करून मिळतो. त्यांच्या हक्काचा त्यांना मिळाले पाहिजे या हेतून शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची स्थापना करण्यात आली होती. या माध्यमातून अनेक गोरगरीब, गरजूवंत, आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना शासनाच्या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी हे वैद्यकीय मदत कक्ष सुरू करण्यात आले होते. शिवसेना वैद्यकीय मदत पक्षाच्या माध्यमातून अनेक गरजूवंतांना त्यांच्या हक्काचा मोबदला योग्य ते उपचार योग्य ती मदत वेळोवेळी मिळवून देण्यात आली आहे. जामखेड येथील डॉ.सहर्ष घोलप यांची शिवसेना वैद्यकीय मदत पक्षाच्या राज्य कार्यकारणीवर निवड करण्यात आली आहे. निवड पत्र संस्थापक अध्यक्ष मंगेश नर्सिंग चिवटे यांच्या हस्ते त्यांना देण्यात आले आहे.

मी अनेक वर्षापासून आरोग्य क्षेत्रामध्ये काम करत आहे. अनेक गरजवंतांना शासनाच्या योजना व त्यांना योग्य उपचार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत असून त्यांना योग्य ते मार्गदर्शनही केले आहे. आता शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची जबाबदारी असल्याने अधिक आरोग्य क्षेत्रामध्ये चांगलं काम करण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे. शिवसेना वैद्यकीय पक्षाच्या माध्यमातून प्रधानमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर ट्रस्ट, सर रतन टाटा ट्रस्ट यांच्यासारख्या विविध ट्रस्टच्या माध्यमातून मदत मिळवून देण्यासाठी थेट बाळासाहेब भवन येथे संपर्क साधून गरजूवंतांना मदत मिळून देता येईल हे माझं भाग्य समजतो.

डॉ.सहर्ष घोलप,राज्य कार्यकारिणी सदस्य शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष

# राष्ट्रीय माध्यमिक विद्यालयात प्रवेशोत्सव

बीड । प्रतिनिधी

प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालय व राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड येथे शाळेच्या पहिल्या दिवशी प्रवेश उत्सव साजरा करण्यात आला. दिनांक १६.०६.२०२५ शाळेचा पहिला दिवस यामध्ये रांगोळी, वर्ग सजावट, शाळा सुशोभीकरण करण्यात आली. सकाळी विद्यार्थी उत्साहात शाळेच्या वेळेत आल्यानंतर औक्षण करून गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच कार्टून ड्रेस परिधान केलेल्या मोटू-पतलू कडून सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यासोबत आलेल्या पालकांचे पुष्पगुच्छ देऊन शाळेच्या मुख्याध्यापिका तायडे डी. ओ. व प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक पाटील ए. आय. व सर्व सहकारी शिक्षक यांनी स्वागत केले.



शाळेच्या परिवहन समितीतर्फे सर्व रिक्षाचालकांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यानंतर शालेय परिपाठ घेऊन खाऊ वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली. यानंतर पहिल्याच दिवशी शालेय पुस्तकाचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. याप्रसंगी प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालय, राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# आरोग्य सेविका चंद्रकला कुडके यांचा सेवा समारोप

बीड। प्रतिनिधी

चंद्रकला माणिकराव कुडके यांचा सेवाकाळ १९८६ ते १९८७ या दरम्यान झाले त्यांची प्रथम नियुक्ती मार्च १९८८ मध्ये उमापूर पी एस सी अंतर्गत धोंडराई सब सेंटरला प्रथम नियुक्ती मिळाले तसेच त्यांच्या वैयक्तिक कारणास्तव त्यांनी स्वतः मादळमोही ते डेपुटेशन करून घेतले तेथील वर्षाचा तीन वर्षाचा त्यांच्या काळ अस्तित्वात होता त्यानंतर प्रशासकीय बदली गंगामसला प्राथमिक आरोग्य केंद्र येथे झाले तेथे नऊ वर्षे सेवा त्यांची झाले तेथून परत प्रशासकीय बदली पोहणेर पी एच सी हिवरा गोवर्धन प्राथमिक उपकेंद्र तिथे त्यांनी सहा वर्षे सेवा केले अंतर्गत २००१ मध्ये इसवी सन २००७ मध्ये बीड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र ताडसोन्ना या ठिकाणी अविरत सेवा अठरा वर्षाचा प्रदीर्घ काळानंतर आज दिनांक १५ जून २०२५ रोजी ३८ वर्षे तीन वर्षे पूर्ण होऊन त्यांची सेवा समाप्त होत आहे त्यांच्या या सेवेच्या कालावधीमध्ये अनेक समस्याला तोंड द्यावे लागत होते पूर्वी कोणतेही गावांमध्ये वाड्यावरती वस्तीजायला रस्ते होते.

चिखलामध्ये पायी प्रवास आठ ते दहा किलोमीटर करावा लागत होता सेवा करत असताना कठीण परिस्थितीत सेवा केलेली आहे त्यांनी एलएचव्ही ट्रेनिंग यशस्वी पूर्ण केले आहेत त्यांना महाराष्ट्र शासनाचे विविध पुरस्कार देखील मिळाले आहेत त्यांचा सेवा समाप्ती समारोप समारंभ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बीड तालुक्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.संजय कदम पाटोदा तालुक्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.नरेश जी कासट साहेब प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. समरीन फातिमा तसेच जिल्हा परिषद ताडसन्ना शिक्षिका चंदा सारसेकर यांची सर्वांची उपस्थिती या कार्यक्रमात डॉक्टर नरेश कासट व डॉ. संजय कदम यांनी श्रीमती चंद्रकला कोकाटे यांच्या कार्याबद्दल गौरव कडून प्रशंसा केले होतीशाळेतील शिक्षिका यांनी उपस्थित राहून जिल्हा जिल्हा रुग्णालय बीड परिचर्या कॉलेजच्या प्राचार्य सुवर्णा बेद्रे जिल्हा रुग्णालय येथील सीनियर मॅटरन श्रीमती रमागिरी सह आशा स्वयंसेविका अंगणवाडी सेविका त्यांच्या परिचयातील बीड जिल्ह्यातील सर्व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

**टीसी हरवला आहे**

**आजेश आसाराम बिजोले या नावाचा १०वी पासचा टीसी पुरुषोत्तमपुरी ते माजलगाव प्रवास दरम्यान हरवला आहे सापडल्यास या नंबर वरती संपर्क साधा**

**संपर्क**

**मो:८६०५३६७४३५**

**टीसी हरवला आहे**

**संतोष धोंडीराम घुंगासे या नावाचा १०वी पासचा टीसी पुरुषोत्तमपुरी ते माजलगाव प्रवास दरम्यान हरवला आहे सापडल्यास या नंबर वरती संपर्क साधा**

**संपर्क**

**मो:७९७२५९१९९२**

# मादळमोही जवळील विठ्ठल गडावर उगवली विकासाची पहाट

## कोट्यावधी रुपयांतून साकारल्या योजना,अध्यात्मासह शिक्षणावर भर

बीड। प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील मादळमोही गावाजवळून हाकेच्या अंतरावर असलेल्या डोंगर कुशीत वसलेलं अनेक शतकांचं विठ्ठल गड देवस्थान आहे. डोंगर पठारावर वसलेलं श्री विठ्ठल देवस्थान अध्यात्माचं अधिष्ठान आहे. मात्र गेल्या काही वर्षात येथे भाविकांना सोयी उपलब्ध नसल्याने अडचणी यायच्या. याच गोष्टींची दखल घेत श्री क्षेत्र नारायण गडचे महंत शिवाजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व श्रीक्षेत्र नारायण गडचे उत्तराधिकारी संभाजी महाराज यांच्या पुढाकारातून या विठ्ठल गडावर आता विकासाची पहाट उगवली आहे. महंत शिवाजी महाराज आपल्या कीर्तनातून वारंवार सांगतात शेतीविका परंतु आपल्या मुलांना शिका, त्याच युक्तीची जाण ठेवत श्री विठ्ठल गडावरून आता अध्यात्मा बरोबर शिक्षणाची ही मुहूर्तमेंत रोवल्या जात आहे. गडावर वृक्षारोपणातून निसर्ग सौंदर्य मोठ्या प्रमाणात खुले असून भक्तनिवास दक्षिण



मारुती मंदिर विद्यार्थ्यांसाठी राहण्या साठी होस्टेल अभ्यासिका व सुसज्ज असे रस्ते पिण्याच्या पाण्याची सोय आधी सोयी विठ्ठल गडावर आता साकारत आहेत. यामुळे विठ्ठल गडावर विकासाची पहाट उगवल्याची भावना भाविकातून व्यक्त होत आहे.

मादळमोही पासून काही अंतरावर डोंगरावर असलेल्या श्री विठ्ठल मंदिर हे मादळमोही सह परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान व अध्यात्मिक ऊर्जा केंद्र आहे. गेल्या अनेक शतकापासून मादळमोही सह परिसरातील भाविक या विठ्ठल गडावर पूजापाठसह वारकरी संप्रदायाची पताका रोवून आहेत. या गडावरून हरिनामाचा जागर सतत होत असतो. असा महत्त्वाचा गड असला तरी गेल्या काही वर्षापासून गडावर भाविकांसाठी पुरेशा सोयी सुविधा उपलब्ध नसल्याने हा गड काहीसा अडगळीला पडल्यासारखा होता. एकीकडे श्रीक्षेत्र नारायण गड, मादळमोही येथील जगद्गुरु संत तुकाराम महाराज मंदिर असे संस्थान भव्य स्वरूप घेत असताना या गडावरही भाविकांसाठी विकास कामे व्हायला पाहिजे अशी भूमिका महंत शिवाजी महाराज यांनी व्यक्त केली होती. श्री क्षेत्र नारायण गड असो, पंढरपूर असो, आळंदी असो, पैठण असो किंवा मादळमोही अशा ठिकाणी भाविकांसाठी सोयी सुविधा निर्माण व्हाव्यात व येथून अध्यात्माबरोबर समाज सन्मार्गाला लावणे व मुलांचे शिक्षण यास महंत शिवाजी महाराज यांनी प्राधान्य देत त्या दृष्टीने गेल्या वीस वर्षात वाटचाल सुरू केली आहे. याच पावलावर पाऊल ठेवत महंत संभाजी महाराज यांनी श्री विठ्ठल गडाचा विकासाचा ध्यास घेतल्याने आज गडाचे रूपडे पालटल्याचे दिसून येत आहे.

मादळमोही येथील ज्येष्ठ नागरिक आसाराम अण्णा तळेकर म्हणाले की श्री विठ्ठल गड येथे सोनाबाई (बायना अक्का) व शांताबाई या महिला भाविक वारकरी भक्तांनी तहहयात विठ्ठल गडाची सेवा केली, या सेवेचे आज वटवृक्षात रूपांतर झाल्याचे दिसून येत असल्याचेही तळेकर अण्णा म्हणाले.

आज घडीला विठ्ठल गड येथे साडेसात कोटी रुपयांची कामे सुरू आहेत. यामध्ये भव्य असे भक्तनिवास, दक्षीणमुखी मारुती मंदिर, विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह, वाचनालय, भव्य हॉल, पिण्याचे पाण्याची सोय आदीसोयी उपलब्ध केल्या आहेत. विठ्ठल गड परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केल्याने गडाने हिरवाईची कास धरली आहे. यासह सुसज्ज असे रस्ते व विद्युत रोषणाई केल्याने विठ्ठल गड दूरदुरहुनच आकर्षणाचे केंद्रही ठरत आहे. श्री विठ्ठल गडावर विकासाची ही नवी पहाट उगवल्याने मादळमोही सह मुळकवाडी मानमोडी वंजारवाडी कुंभारवाडी यासह परिसरातील सर्वच वाडी व गावातील ग्रामस्थ व वारकऱ्या मधून आनंद व्यक्त होत आहे.

# पंतप्रधान मोदी विशाखापट्टणम येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करणार

## भारतात एक लाखाहून अधिक ठिकाणी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी २१ जून रोजी सकाळी ६. ३० ते ७:४५ या वेळेत भारतातील एक लाखाहून अधिक ठिकाणी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवतील यावर्षी हा कार्यक्रम आयुष मंत्रालय व स्वच्छ भारत मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने होणार असून योग साधने बरोबरच परिसरातील स्वच्छता, वृक्षारोपण आदी कार्यक्रमही या निमित्ताने आयोजित करण्याचे जल जीवन मिशन च्या



अतिरिक्त अभियान संचालक सुषमा सातपुते यांनी एका पत्राद्वारे सूचित केले आहे.

जलजीवन मिशनच्या अतिरिक्त अभियान संचालक सुषमा सातपुते यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की येत्या २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे. हा उपक्रम दहा विशेष कार्यक्रमात विभागला असून यानिमित्त योगासंगम हा कार्यक्रम आयुष्यमान आरोग्य मंदिर व ग्रामपंचायत पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या माध्यमातून घेता येईल. याबरोबरच हरित योग या कार्यक्रमांतर्गत वृक्षारोपण स्वच्छता मोहीम सामुदायाच्या पुढाकारातून राबविण्यात यावी. या कार्यक्रमात पाणी ,स्वच्छता व आरोग्य या दृष्टिकोनाचा समावेश करण्यात आला आहे .स्वच्छता समित्यांनी योग फॉर वेल बीइंग अँड वॉश या संमेलनाचे आयोजन करावे. त्यासाठी संबंधितांच्या बैठका घ्याव्यात कार्यक्रमापूर्वी परिसर व पाणी स्वच्छता आरोग्य संबंधित पायाभूत सुविधा स्वच्छ करणे, जलजीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशन टप्पा-२ मालमत्तासमोर योगसूत्र आयोजित करणे, समुदाय योग क्रिया व योजनांची मालमत्ता दर्शवणाऱ्या स्पष्ट छायाचित्रांची नोंद करणे, यात सर्वांचा सक्रिय सहभाग नोंदवून हा कार्यक्रम यशस्वी करावा. याला फेसबुक, इंस्टाग्राम, इंस्टाग्राम, युट्युब वर प्रसिद्धी द्यावी आदी बाबींच्या सूचना जलजीवन मिशनच्या अतिरिक्त अभियान संचालक सुषमा सातपुते यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# वाळुची चोरटी वाहतुक करणाऱ्या विरुध्द माजलगाव शहर पोलीसांची कार्यवाही

माजलगाव । प्रतिनिधी

येथील शहर पोलीसांना मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे माजलगाव ते मंजरथ रोड लगत असलेल्या नवीन ईदगाह समोर दि १५ जुन रविवार रोजी सकाळी ०५:५० वाजण्याच्या सुमारास ट्राक्टरमध्ये अवैधरित्या वाळुची चोरटी वाहतुक करणारे एक सोनालिका कंपनीचा ट्राक्टर क्रमांक एम.एच १२ के.जी.८९९८ किमंती ३,०००००/ (तीन लाख) व त्यामध्ये असलेली एक ब्रास वाळु किंमती ५०००//- रुपये असा एकुण ३,०५०००/ (तीन लाख पाच हाजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात औआलेला असुन ट्राक्टर चालक संजय पांडुरंग अडागळे रा.मु. खापरवाडी पो. काडीवडगाव ता. वडवणी जि.बीड, अश्फाक बेग अहेमद बेग रा. गांधणपुरा, माजलगाव (ट्राक्टर मालक) यांचे विरुध्द गु.र.नं. २१९/२०२५ कलम ३०३(२), ३(५) भारतीय न्याय संहिता २०२३ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही नवनित काँवत, पोलीस अधीक्षक बीड,श्रीमती चेतना तिडके,अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, स.पो.नि. प्रल्हाद मुंडे,पोउपनि संदीप राठोड,पो. अंमलदार अमोल कदम,शिवगणेश मिरकले यांनी केली आहे.

# अभियंता पदावर नियुक्तीबद्दल मराठी शिक्षक महासंघाकडून राजकुमार खेडकर यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील घाटशिळ पारगाव येथील भूमिपुत्र राजकुमार आश्रुबा खेडकर याची एमपीएससी मार्फत सहाय्यक अभियंता पदावर नियुक्ती झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी भाषा विषय शिक्षक महासंघाच्या वतीने सोमवारी सत्कार करण्यात आला.



महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाच्या वतीने ग्रामीण आणि सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करून अभिनंदन आणि स्वागत करण्याची परंपरा आहे. घाटशीळ पारगाव येथील भूमिपुत्र राजकुमार अश्रुबा खेडकर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये सहाय्यक पदावर मजल मारल्याबद्दल त्याचा विशेष अभिनंदन करून त्याचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी त्याला पुढील भविष्यातील आणखी यशासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाचे बीड जिल्हा सचिव प्रा.बिभिषण चाटे सर, घाटशिळा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य वारभुवन सर, आरोग्य मार्गदर्शक आश्रुबा खेडकर,प्रा. बी.के. मुंडे सर,प्रा.के.एच. सय्यद, प्रा.एस.ए. बटुळे, यांच्यासह शिक्षक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी विद्यालयात शाळा प्रवेशोत्सव



माजलगाव । प्रतिनिधी

येथील छत्रपती शिवाजी विद्यालयात शाळा प्रवेशोत्सव, नवागतांचे स्वागत व मोफत पाठ्यपुस्तक वितरण कार्यक्रम दि १६ जुन सोमवार रोजी घेण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक मनोज सोळंके होते.

नवीन शैक्षणिक वर्ष २०२५- २६ हे सोमवार दि.१६ जूनपासून सुरु झाले आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी आलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले, तसेच शासनाच्या मोफत पाठ्यपुस्तक योजनेअंतर्गत उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक मनोज सोळंके, बालासाहेब झोडगे, आप्पासाहेब होके, विष्णू गडकर, माधव घोलप, मुरलीधर भाळशंकर, ◀◀ पान ३ वर

# आज शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार

**बीड । प्रतिनिधी**

**शिक्षकेत्तर कर्मचार्यांच्या प्रदिर्घ संघर्षानंतर शिक्षकेत्तर कर्मचार्यांच्या भरती प्रक्रियेला परवानगी दिली आहे. पण शासनानेच शिक्षकेत्तर कर्मचारी बंदचा पुन्हा आदेश काढला आहे शासनाच्या या परस्पर विरोधी भुमीकेच्या निषेधार्थ जिल्हाधिकार्यांना शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्या वतीने विविध मागण्यासंदर्भात निवेदन देण्यात येणार आहे.**

दि. २८ मे रोजीच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिकच्या संचालकांच्या परिपत्रकामुळे या भरतीला स्थगिती देण्यात आली आहे त्यामुळे हे अन्यायकारक परिपत्रक रद्द करून शिक्षक संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दि.२८ मे २०२५ रोजी शिक्षकेत्तर पद भरती बाबत काढलेले पत्रक त्वरीत रद्द करून पद भरती सुरू करण्यात यावी. माध्यमिक शाळातील शिक्षकेत्तर कर्मचार्यांना २४ वर्षाचा दुसरा लाभ हा राज्य शासकिय कर्मचार्यांप्रमाणे पुर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात यावा, माध्यमिक शाळांतील शिक्षकेत्तर कर्मचार्यांसाठी बक्षी समितीने शिफारस केल्याप्रमाणे नवीन सुधारीत आश्वासीत प्रगती योजनेचा १०, २०, ३० वर्षा नंतरचा लाभ तात्काळ लागू करण्यात यावा, माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक पदासाठी पात्र असणारे शिक्षकेत्तर कर्मचारी यांना पवित्र प्रणालीतून वगळून विना अट शिक्षक पदावर वेतन श्रेणीत पदोन्नती देण्यात यावी, चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांची पदे कंत्राटी पध्दतीने न भरता ती पुर्वीप्रमाणे शासन नियुक्त मान्यताप्राप्त असावी या मागण्यांचे निवेदन बीड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्या वतीने आज मंगळवार दि.१७ जून रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात येणार आहे. तरी शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय डावकर, उपाध्यक्ष शेख मोहसीन, संदीप वनवे, सचिव नामदेव वाघ, कार्याध्यक्ष अविनाश कळमकर आदिंनी केले आहे.

# श्री सिध्देश्वर विद्यालयात नवागतांचे स्वागत,प्रवेशोत्सव



माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात सत्रारंभी व्यासपीठावर मुख्याध्यापक संतोष लिंबकर, सिद्धेश्वर संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी,संकुलाचे कार्यवाह विश्वासराव जोशी,माध्यमिक विभागाचे अध्यक्ष प्रशांत भानप,सिध्देश्वर महाविद्यालयाचे अध्यक्ष अभयर कोकड,प्राचार्य मुकुंद देवर्षि, उपमुख्याध्यापक शैलेश कंगळे,रवींद्र खाडवे,सदाशिव, ढगे,अभ्यासपूरक मंडळ प्रमुख अपर्णा मुळे, इत्यादि मान्यवरांची उपस्थिती होती. विद्येची अधिष्ठात्री देवता सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते झाले.

या प्रसंगी मुख्याध्यापक यांनी नवागत विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देवून स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या.मान्यवरांच्या हस्ते मोफत पाठ्यपुस्तकांचे वितर ◀◀ पान ३ वर

# शहरात न.प. निवडणुकीचे वारे वाहू लागले आजी -माजी आणि भावी नगरसेवक लागले कामाला

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**आगामी येऊ घातलेल्या नगरपरिषद निवडणुकीचे वारे अंबाजोगाई शहरात वाहू लागले आहे. आजी माजी आणि भावी उमेदवार आपआपल्या पद्धतीने रणनीती व नियोजन करण्यात व्यस्त झाले आहेत. कोणत्या पक्षाची उमेदवारी मिळेल या कडे उमेदवारांचे लागले असून पूरक काम इच्छुक उमेदवार करतांना दिसत आहेत. तर शहरातील प्रमुख नेते मंडळीही कामाला लागली असून नगर परिषदेच्या निवडणुकीचे पडघम वाजले आहेत. निवडणूक विभागाचे तसे परिपत्रकहीआले आहेत. अंबाजोगाई शहरातील प्रभाग रचना व्यवस्थित करण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. रचना झाल्यानंतर आरक्षण सोडत होईल. वेळेस राजकीय आरक्षण नसल्यामुळे एससी.आणि एसटी समाजाचे आरक्षण प्रवर्गासाठी राहतील,**



हे सोडून इतर बऱ्याच वार्डात रस्सीखेच होण्याची शक्यता आहे. भाजप शिवसेना (शिंदे गट) व राष्ट्रवादी (अ.प.गट) विरुद्ध काँग्रेस, राष्ट्रवादी (श.प. गट) शिवसेना ( उबाठा) तसेच स्थानिक आघाडी व इतर पक्षात सरळ लढत होणार आहे. बऱ्याच पक्षात गट तट निर्माण झाले आहेत ते जरी असले तरी प्रत्येक पक्ष नगर परिषदेच्या निवडणुकीत आपली ताकद पणाला लावुन निवडणुकीच्या रिंगणात उतरतील अशी चर्चा शहरात होतांना दिसत आहे. पक्षीय बळ पाहता राष्ट्रवादी (दोन पक्ष) काँग्रेस भाजपा, शिवसेना (दोन पक्ष) असे प्रमुख पक्ष निवडणूक रिंगणात असतील आता या निवडणुकीत घड्याळाची टिकटिक वाढते, भाजपाचे कमळ खुलते कि शिवसेनेचा वाघ डरकाळी फोडतो, तुतारी वाजते हे आता निवडणुकी दरम्यानच कळणार आहे आणखी बऱ्याच घडामोडी घडायच्या आहेत. शहरात सध्या आजी माजी आणि भावी नगरसेवक आता प्रत्येक दिवशी वाढदिवसाचे बॅनर बनवून तरुणांना खुश करण्याचे काम करतांना दिसत आहेत. एक हार, एक केक, आणि शाल एव्हढी इन्व्हेस्टमेंट सध्या शहरात होताना दिसत आहे. निवडणूक आली की ह्या वाढदिवसाचे प्रमाण वाढत असल्याने ''याला निवडणूक लढवायची आहे वाटत'' अशा चर्चा होतांना दिसत आहेत. ये पब्लिक है सब जानती है.

# गो.कु.यो.कन्या विद्यालयात प्रवेशोत्सव उत्साहात

## गुलाब पुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित श्रीमती गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयात प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या संचालिका तथा विभाग प्रमुख अ‍ॅड.कल्याणी विर्धे,शालेय पदाधिकारी

यांच्या प्रमुख उपस्थितीत उपस्थित विद्यार्थिनींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

तसेच विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पाठ्यपुस्तक व मिठाई देऊन नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलताना अ‍ॅड.विर्धे म्हणाल्या की,योगेश्वरी शिक्षण संस्थेने शैक्षणिक उद्दिष्टांचे भान कायम ठेवून शिक्षण क्षेत्रातील मुल्ये



व दर्जा जोपासत भरीव प्रगती साधून यशाची उज्वल परंपरा विकासित केली आहे विद्यार्थीनींनी अभ्यास करून ही परंपरा पुढेही जतन करावी व संस्थेचे, शाळेचे नाव उज्वल करावे असे सांगितले. विद्यालयातील विद्यार्थिनी पहिल्याच दिवशी मोठ्या आनंदात दिसत होत्या.

# जिल्हा परिषद कारेगव्हाण शाळेत जिल्हाधिकारी जॉन्सन यांची उपस्थिती

## पहिलं पाऊल : स्कुल चले हम; बालविवाहमुक्तीची शपथ व वृक्षारोपण





बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारेगव्हाण येथे प्रवेशोत्सव २०२५ मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासोबत मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी, माध्यमिक शिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले, उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे, *शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर तोडकर, जिल्हा समन्वयक संजय मोरे, सरपंच व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत* करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप करण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्साह व पालकांचा सहभाग उल्लेखनीय होता. या वेळी जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी गेल्या दोन वर्षांपासून कारेगव्हाण येथे एकही बालविवाह न झाल्याचे कौतुक करत, *बीड जिल्हा बालविवाहमुक्त करण्यासाठी शपथ दिली. त्यांनी शिक्षणात सातत्य ठेवण्याचे आवाहन करत गावकऱ्यांच्या सहकार्याची ◀◀ पान ३ वर

# आरोग्यदूत मंगेश चिवटे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा

## रुग्णसेवक शरद झोडगे,रुग्णसेवक शिवराज आंधळकर यांचे आयोजन

बीड । प्रतिनिधी -

रुग्णसेवा म्हणजे ईश्वर सेवा याचं ज्वलंत उदाहरण म्हणजे मंगेश दादा चिवटे, गेल्या अनेक वर्षापासून मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून अनेक गरजू रुग्णांना मदत करणारे, महाराष्ट्राचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे विश्वासु तथा शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे संस्थापक, उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी प्रमुख मंगेश चिवटे सर हे सर्वांना परिचित आहेतच.वाढदिवस म्हटलं की केक हारे,तुरे,डीजे असा अवाढव्य खर्च आला परंतु या खर्चाला फाटा देत शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष बीड, धर्मवीर प्रतिष्ठान, बाजीराव दादा चव्हाण मित्रपरिवार व रुग्णसेवक शरद झोडगे आणि रुग्णसेवक शिवराज आंधळकर यांच्या माध्यमातून मंगेश दादा चिवटे यांचा वाढदिवस बीडमध्ये विविध सामाजिक उपक्रम घेऊन साजरा केला यामध्ये भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले होते या शिबिरामध्ये जो रक्तदान करेल त्याला एकनाथ रक्तदाता सुरक्षा कवच योजना म्हणून दशलक्ष रुपयांचा अपघाती विमा मोफत देण्यात आला, यानंतर बीड शहरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्र येथे अन्नदान व फळ वाटप कार्यक्रम आयोजित केला होता. जिव्हाळा वृद्धाश्रमातील शुभेच्छा मंगेश दादा चिवटे यांनी व्हिडिओ कॉलद्वारे स्वीकारल्या व रुग्णसेवक शरद झोडगे व रुग्णसेवक शिवराज आंधळकर आणि बाजीराव दादा चव्हाण ◀◀ पान ३ वर





This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पलटी झालेल्या ट्रकची बसला भीषण धडक; चालक गंभीर




**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात अपघातांचे सत्र सुरूच आहे. पुण्यातील महत्वाचे ठिकाण असणाऱ्या चांदणी चौकात भीषण अपघात घडला आहे. पुण्याच्या चांदणी चौकात तेलगळती झाल्याने एक ट्रक पलटी झाला आहे. त्यामुळे या ट्रकची बसला भीषण धडक बसली आहे. ट्रक पलटी झाल्यानंतर पाच ते सहा गाड्या एकमेकांना धडकल्याची माहिती समोर येत आहे. या अपघातामुळे चांदणी चौकातील वाहतूक ठप्प झाली आहे.

पुण्यातील चांदणी चौकात भीषण अपघात झालेला आहे. तेलगळती झाल्याने एक ट्रक उलटला आणि तो जाऊन बसला धडकला. या दहकेत बसचे मोठे नुकसान झाले आहे. या धडकेत बसचा चालक गंभीर जखमी झाला आहे. तसेच ५ ते ६ गाड्या एकमेकांना धडकल्याची माहिती समोर येत आहे. या भीषण अपघातामुळे चांदणी चौकात वाहतूक कोंडी झाली.

बेदरक व निष्काळजी ट्रक चालकामुळे गंगाधाम चौकात दुचाकीस्वार सासऱ्यांना व सूनेला चिरडल्याची घटना ताजी असताना आणखी एक अशीच घटना घडली असून, बेदरक आणि निष्काळजी टुरिस्ट कार चालकाने फुटपाथवरून पायी निघालेल्या महाविद्यालयीन तरुणीला धडक दिली आहे. यात तरुणीचा जागीचं मृत्यू झाला आहे. कात्रजमधील सुखसागरनगरमध्ये भरदुपारी ही घटना घडली असून, कार चालवण्याचे मित्राकडून शिक्षण घेताना ही घटना घडली असावी, असा अंदाज पोलिसांचा आहे. मिळालेल्या माहितीनुसार, श्रेया एका महाविद्यालयात शिक्षण घेत होती. ती राहण्यास कोंढवा- कात्रज रस्त्यावरील एका सोसायटीत होती. ती शुक्रवारी दुपारी दोनच्या सुमारास सुखसागरनगर येथील यशश्री सोसायटीच्या समोरील फुटपाथवरून पायी चालत जात होती. दुपारची वेळ होती. त्यामुळे काही नागरिक देखील रस्त्याच्या कडेला उभारले होते. तेव्हा भरधाव कार फुटपाथावर चढून तिने प्रथम एका नाराळाच्या झाडाला धडक दिली. नंतर कारने श्रेया यांना धडक दिली आणि एका बदामाच्या झाडाला धडकली.

# गुंतवणुकदारांना कोट्यवधींना चुना, अजय चौधरीचा जामीन फेटाळला

**पुणे । प्रतिनिधी**

सरकारी मॅग्नेट प्रोजेक्टच्या नावाखाली गुंतवणूकदारांची ९ कोटी ५० लाख रुपायांहून अधिक रकमेची फसवणूक केल्याप्रकरणातील आरोपी अजय श्यामकांत चौधरी (रा. गजनिया गार्डन, भांडारकर रोड) याचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला. अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए. एस. वाघमारे यांनी हा आदेश दिला. याप्रकरणात, आतापर्यंत ११ हून अधिक जणांची फसवणूक झाली असून ३ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत, राहुल रामराजे मक्तेदार (वय ४३, रा. शंकर कलाटेनगर, वाकड) यांनी डेक्कन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.


येरवडा येथील कारागृहात असलेल्या चौधरी याने गुन्ह्यात जामीन मिळावा यासाठी न्यायालयात अर्ज केला. त्यास सरकारी वकीलांसह मूळ फिर्यादितर्फे ॲड. प्रतिक राजोपाध्ये, ॲड. अमेय रानडे व अन्य एका फिर्यादितर्फे ॲड. निखील कुलकर्णी यांनी विरोध केला. चौधरी अन्य साथीदारांनी परस्पर संगनमताने पंचगणी देवस्थान ट्रस्टच्या भोगवटादार वर्ग ३ च्या जमिनीचा विकास करण्याच्या नावाखाली शासन व प्राधिकरणाची परवानगी न घेता गुंतवणूकदारांकडून ठेवी स्वीकारून गुंतवणूकदारांसह शासनाचीही फसवणूक केली आहे. चौधरीकडून सुहास वाकडे यांच्या खात्यावर ७५ लाख रुपये रक्कम हस्तांतरित झाल्याचे आढळून आले आहे. आरोपींमार्फत गुंतवलेली रक्कम नेमकी कुठे वापरली गेली, त्यांनी जंगम किंवा स्थावर मालमत्ता खरेदी केली आहे का? याचा तपास करायचा आहे.

चौधरी आणि नाहाटा यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार झाले आहे. गुन्ह्याचा तपास अद्याप प्राथमिक टप्प्यात असल्याने आरोपीच्या चौकशीसह साक्षीदारांचे जबाब नोंदविणे अद्याप बाकी आहे. एफआयआरमध्ये त्याचे नाव नमूद असून भाडेपट्टा कराराच्या आधारावर ४३ कोटी रुपयांचे व्यवहार शासनाला माहिती न देता करण्यात आलेले आहे. त्याला जामीन मंजूर झाल्यास तो तपासास सहकार्य करणार नाही. साक्षीदारांना धमकाविण्यासह पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तो यापूर्वीही वारंवार परदेशात गेला असून खटल्याच्या सुनावणीस हजर राहणार नाही, असा युक्तीवाद सरकारपक्षासह ॲड. राजोपाध्ये, ॲड. रानडे व ॲड. कुलकर्णी यांनी केला.

**तत्कालीन सभापती नाहाटा अद्याप फरारच**

याप्रकरणात, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) पदाधिकारी, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे तत्कालीन सभापती बाळासाहेब ऊर्फ प्रवीणकुमार नाहाटा यांविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ते अद्याप फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहे. तर, चौधरी व जोशी हे येरवडा कारागृहात आहे. याप्रकरणात आतापर्यंत ११ जणांची फसवणूक झाल्याचे उघडकीस आले असून, फसवणुकीचा आकडा ९ कोटी ४९ लाख ३५ हजारांच्या घरात असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# संताजी महाराज जगनाडे पालखी सोहळ्याचे सुदुंबरे येथून १८ जूनला पंढरपूरकडे होणार प्रस्थान

**मावळ । प्रतिनिधी**

संत शिरोमणी तुकाराम महाराज यांच्या गाथेचे पुनर्लेखन करणारे आणि प्रमुख टाळकरी संताजी महाराज जगनाडे यांच्या श्रीक्षेत्र सुदुंबरे, ता. मावळ येथील समाधी मंदिरापासून ज्येष्ठ वैद्य सप्तमी शके १९४७, बुधवार, दिनांक १८ जून २०२५ रोजी दुपारी ४ वाजता पालखी आणि पादुका रथातून विठ्ठल नामाच्या गजरात हजारो वारकरी बंधू-भगिनींच्या साक्षीने श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे.

या पालखी सोहळ्यात रथापुढे सहा आणि मागे एक अशा सात दिंड्या, तसेच ५००० वारकरी बंधू-भगिनी सहभागी होणार आहेत. सोहळ्यापुढील मानाचा अश्व हातवळण येथील भानुदास गवळी यांचा आहे, तर रथ यवत येथील प्रगतिशील शेतकरी ह.भ.प. छबनराव महादेव कुदळे यांनी पुरवला आहे. यावर्षी चिखली टाळगाव येथील पोपटराव किसनराव पिंगळे यांनी चांदीची नवीन पालखी बनवून विश्वस्त मंडळाकडे सुपूर्द केली आहे.

दिनांक १८ जून २०२५ रोजी सुदुंबरे येथील विठ्ठल मंदिराजवळ पालखीचा पहिला मुक्काम असेल. १९ जून २०२५ रोजी सकाळी ७:३० वाजता श्रीक्षेत्र देहू मार्गे संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यामागे चिंचवड स्टेशन येथील राका गॅस दुकानात मुक्काम होईल. २० जून २०२५ रोजी सकाळी ७:३० वाजता नाशिक फाटा, खडकी मार्गे पुण्यातील भवानी पेठेतील तेली धर्मशाळा ८२ येथे रात्रीच्या मुक्कामासाठी पालखी जाईल. पालखी सोहळ्याचे नियोजन अध्यक्ष नारायण शिरसागर, उपाध्यक्ष गंगाधर हाडके, सचिव अरविंद रत्नपारखी गुरुजी, खजिनदार मनोहर जाधव, ताराचंद देवराय, हरिभक्त परायण बाळकृष्ण वाळुंजकर, अरुण काळे, कोंडीबा दिवेकर, उल्हासराव वालझाडे, प्रदीप वाव्हळ, बाळासाहेब काळे, विश्वास डोंगरे, अप्पासाहेब शेलार, सौ. जयश्री राऊत, अनिल राऊत, राजेंद्र तेली आणि दिनेश जगनाडे यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. या सोहळ्यासाठी बहुसंख्येने उपस्थित राहावे, अशी विनंती अरविंद रत्नपारखी गुरुजी यांनी केली आहे.

# 'कुंडमळा' दुर्घटनेनंतर जिल्हाधिकारी ॲक्शन मोडमध्ये; दिले 'हे' महत्वाचे आदेश




**पुणे । प्रतिनिधी**

कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवरील जूना पूल कोसळल्याची घटना घडल्यावर याची गंभीर दखल घेत, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी जिल्ह्यातील सर्व जुने व जीर्ण झालेले पूल,साकव दुरुस्ती करण्याऐवजी काढूनच टाकण्याचे आदेश जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले आहेत. दरम्यान आठच दिवसांपूर्वी जिल्हाधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांना जिल्ह्यातील पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार संबंधित यंत्रणांनी तेथे बॅरिकेटिंग केले होते. परंतु अद्याप हा एकत्र अहवाल आला नसल्याने जिल्ह्यात असे किती धोकादायक पूल आहेत हे अंधारात आहे.

मावळ तालुक्यातील तळेगाव दाभाडे शहराजवळील कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवरील जूना पूल रविवारी दुपारी कोसळून यामध्ये चार जणांचा मृत्यू झाला तर ५१ जण नदीत पडले होते. अवघ्या अर्ध्या तासात या ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा पोहचल्याने या सर्वांना वाचविण्यात यश आले. या ठिकाणी हा पूल धोकादायक आहे असा फलक लावून बॅरिकेटिंग करून तो बँद केला होता. पण उत्साही पर्यटक यांनी त्याच्यावर एकाच वेळी गर्दी केल्याने तो कोसळला.

याबाबत जिल्हाधिकारी डुडी यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, ही घटना घडण्यापूर्वीच आठ दिवस अगोदर जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभाग यांना जिल्ह्यातील जुन्या व जीर्ण झालेल्या साकव पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार या दोन्ही यंत्रणांनी ऑडिटचे काम करून त्या ठिकाणी बॅरिकेटिंग करण्यात आले पण ही घटना या दरम्यानच घडली. त्यामुळे आता जिल्ह्यातील जीर्ण साकव ( दोन गावांना नदीवरून जोडणारा छोटा पूल), धोकादायक पूल पूर्णपणे काढून टाकण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**कुंडमळा दुर्घटनेची सखोल चौकशी; अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना**

**समिती सूक्ष्म चौकशी करणार**

सदर घटनेची सूक्ष्म चौकशी करण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी सुहास मापारी यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना करण्यात आली आहे. या चौकशी समितीचा अहवाल पंधरा दिवसांत आल्यानंतर संबंधितांवर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच अशा घटना भविष्यात घडू नये म्हणून जी एस ओ पी ( प्रमाणित कार्य पद्धती) तयार केली आहे त्यात काही बदल करन्याबाबत ही समिती काम करणार आहे. या समितीत उप वन संरक्षक, पोलीस उपायुक्त पिंपरी चिंचवड, अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ व निवासी जिल्हाधिकारी राहणार आहेत.

# पुणे जिल्ह्यात संततधार; लोणावळ्यात अतिवृष्टी, घाटमाथ्याला ऑरेंज अलर्ट



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे, पिंपरी चिंचवडसह जिल्ह्यातील बहुतांश भागात रविवारी (दि.१५) रात्री पावसाने जोरदार हजेरी लावली. जिल्ह्यात सर्वत्र जोरदार पाऊस झाला. सर्वाधिक पाऊस लोणावळामध्ये १२३ मि.मी.ची नोंद झाली. सोमवारी (दि.१६) दिवसभर पावसाची रिपरिप सुरूच होती. दरम्यान, आगामी ४८ तास जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

रविवारी रात्री अरबी समुद्राकडून जोरदार वारे राज्यात आल्याने थांबलेला मान्सून सक्रिय झाला. त्यामुळे रविवारी रात्रीपासूनच पावसाला सुरुवात झाली. पुणे शहरात रात्रभर पाऊस झाला. जिल्ह्यातही बहुतांश भागात पावसाने जोरदार हजेरी लावली. लोणावळामध्ये अतिवृष्टी झाली. या हंगामातील सर्वात मोठा १२३ मि. मी. पाऊस एका रात्रीत तेथे झाला. तसेच, गिरीवन ८४, भोर ८० मि. मी. पाऊस झाला.

**रविवारी रात्री झालेला पाऊस (मि.मी.)**

लोणावळा १२३, गिरीवन ८४, भोर ८०, एनडीए ४६.५, लवळे ४४, पाषाण ४२.५, तळेगाव ३२.५, शिवाजीनगर ३०.५, चिंचवड २८, मगरपट्टा २७.५, डुडुगळगाव २६.५, हडपसर २५, हवेली २०.५, तळेगाव ढमढेरे १९.५, राजगुरुनगर १६, माळीण १३.५, निमगिरी १२, पुरंदर ८.५, दापोडी ८.५, नारायणगाव ४.५, बारामती २.५.

**सोमवारचा पाऊस (मि.मी.)**

कुरवंडे ४६.५, लवासा ३४.५, माळीण २६, भोर २४, निमगिरी २२, गिरीवन १९.५, लवळे १२, तळेगाव ९.५, चिंचवड ९, एनडीए ८, पाषाण ६.८, डुडुळगाव ६, शिवाजीनगर ५.९, नारायणगाव ४, राजगुरुनगर ३, मगरपट्टा ३, हडपसर २, हवेली २, तळेगाव ढमढेरे १, पुरंदर ०.५, बारामती ०.४.

# कात्रज डेअरीकडून दूध दरात दोन रुपयाची वाढ

**कात्रज । प्रतिनिधी**

पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (कात्रज डेअरी)ने दूध विक्री दरात दोन रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. संघाच्या वाहतुक व इतर खर्चात वाढ झाल्याने दूध विक्रीदर वाढविणे क्रमप्राप्त झाल्याने संघाने आज (ता. १६) च्या मध्यरात्रीपासून वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. संघाच्या संचालक मंडळाने हा निर्णय घेतला असल्याचे संघाचे अध्यक्ष स्वप्नील ढमढेरे यांनी सांगितले.

यापूर्वी, डेअरीने मे महिन्यात फुल क्रीम दूध आणि प्रमाणित दूधाच्या दरात दोन रुपयांनी वाढ केली होती. यावेळी मात्र, टोण्ड दूधाच्या दरात वाढ करण्यात आली आहे. मे महिन्यात टोण्ड दूधाच्या दरामध्ये वाढ करण्यात आली नव्हती, असे डेअरी प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. मात्र, आता वाढ केल्याने पुणेकरांच्या खिशाला प्रति लिटरप्रमाणे दोन रुपयांची झळ बसणार आहे.

# शहरात पाच ठिकाणी घरफोड्यांमध्ये ४५ लाखांचा ऐवज चोरी

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात हडपसर, धायरी, कोरेगाव पार्क आणि मार्केट यार्ड अशा विविध भागात शनिवारी रात्री पाच घरफोडीच्या घटनांमध्ये चोरट्यांनी ४५ लाखांहून अधिक किमतीचा ऐवज लांबवला. यामध्ये हडपसरमधील एका सदनिकेतून ३८ लाख ८८ हजार रुपयांचे सोन्याचे, हिरेजडीत दागिने व रोकड चोरी करण्यात आली.

या प्रकरणी हडपसरमधील वैभव चित्रपटगृहामागील सेजल गार्डन सोसायटीतील एका महिलेने फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी सायंकाळी घराला कुलूप लावून कुटुंबीय बाहेर गेले होते. यावेळी चोरट्यांनी सदनिकेचे कुलूप तोडून कपाटातील सोन्याचे, हिरेजडीत दागिने आणि ५५ हजारांची रोकड असा ३८ लाख ८८ हजारांचा ऐवज लंपास केला. रविवारी घरी परतल्यानंतर चोरीचा प्रकार उघडकीस आला. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक दीपिका जवंजाळ करीत आहेत.

हडपसरमधील गोपाळपट्टी परिसरातील केजीएन पार्क सोसायटीमधील सदनिकेतून चोरट्यांनी २९ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. याबाबत एका तरुणाने तक्रार दिली आहे. त्यानुसार हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धायरीतील राजवीर रेसिडेन्सी सोसायटीमधील एका सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी चार लाख ५९ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. ही घटना शनिवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबत एका ४० वर्षीय व्यक्तीने तक्रार दिली आहे. त्यानुसार नांदेड सिटी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बिबवेवाडी-कोंढवा रस्त्यावरील वास्तूनगरजवळ गणांत्र कॉम्प्लेक्समध्येही एका सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी अमेरिकन डॉलर्स, ६५ हजारांचा सोन्याचा बाजूबंद आणि मोबाइल चोरून नेला. या प्रकरणी एका ५० वर्षीय व्यक्तीने मार्केट यार्ड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बंडगार्डन रस्त्यावरील नारंगीबाग परिसरातील नित्यानंद कॉम्प्लेक्समधील एका ज्येष्ठ महिलेच्या घराचे कुलूपही चोरट्यांनी तोडले. त्यानंतर चोरट्यांनी घरातील ऐवज चोरण्याचा प्रयत्न केला. याबाबत महिलेने कोरेगाव पार्क पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

# निघोजे येथील जिल्हा परिषद शाळेत शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा



**पुणे । प्रतिनिधी**

अनेक अधिकाऱ्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षणाची सुविधा उपलब्ध असून पालकांनी आपली मुले जिल्हा परिषदेच्या शाळेत घातली पाहिजे, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले.आपण स्वतःदेखील जिल्हा परिषद शाळेचा विद्यार्थी असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. पुलकुंडवार यांच्या उपस्थितीत नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी खेड तालुक्यातील निघोजे येथील जिल्हा परिषद शाळेत उत्साहात शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, शिक्षणाधिकारी प्राथमिक संजय नाईकडे, गटविकास अधिकारी विशाल शिंदे, गटशिक्षण अधिकारी अमोल जंगले, सरपंच सुनीता येळवंडे आदी याप्रसंगी उपस्थित होते.

या शाळेत पहिल्या वर्गात प्रवेश घेणाऱ्या बालकांना विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी बोट धरून शाळेत नेले. असा अनोखा अनुभव मिळाल्याने त्याचा आनंद बालकांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. शाळेचा हा आनंददायी प्रवेश बालकांच्या आयुष्यातील आनंददायी क्षण ठरला.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पाटील यावेळी म्हणाले, शाळा, ग्रामस्थ आणि पालक यांची एकत्रित भूमिका शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आवश्यक आहे. या कामात निघोजे येथील ग्रामस्थांचा भरीव सहभाग आहे. येथे भविष्यात व्यावसायिक शिक्षणासाठी स्वतंत्र प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असेही श्री. पाटील म्हणाले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांचे वाजतगाजत स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, गणवेश, खाऊ, फुगे व फुले देऊन आनंददायी वातावरणात नव्या वर्षाची सुरुवात करण्यात आली. नववी-दहावीच्या वर्गांचे उद्घाटन आणि कंपन्यांचा सामाजिक उत्तरदायित्व निधी (सीएसआर) अंतर्गत किचनशेडचे लोकार्पणही यावेळी करण्यात आले.

**नववीच्या वर्गांची सुरुवात**

निघोजे शाळेची एकूण पटसंख्या ८३६ असून, यापुढे मुलींना नववी व दहावीच्या शिक्षणासाठी लांब जाण्याची गरज भासणार नाही. हे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी जिल्हा परिषदेच्यावतीने जिल्ह्यातील निघोजे, गलांडवाडी व धानोरे या तीन जिल्हा परिषद शाळांमध्ये नववी-दहावीच्या वर्गांना मान्यता दिली आहे. ही बाब महाराष्ट्रात प्रथमच घडली असून, जिल्हा परिषद शाळांमध्ये माध्यमिक शिक्षणाची उपलब्धता वाढवण्यात मोठा टप्पा गाठण्यात आला आहे. ग्रामस्थांनी याबाबत समाधान व्यक्त केले.

# पहलगाम हल्ल्यानंतर भारत एकाकी, मोदींचे धोरण अपयशी-ॲड. राहुल मखरे



**इंदापूर । प्रतिनिधी**

पहलगाम हल्ल्यानंतर भारताला कोणत्याही देशाचा पाठिंबा मिळाला नाही. पूर्वी बांगलादेश, नेपाळ आणि श्रीलंका भारताचे मित्रराष्ट्र होते, परंतु सध्याच्या नेतृत्वाच्या दिखाऊ धोरणांमुळे हे देश चीनकडे झुकले आहेत. देशाची सुरक्षा आणि सार्वभौमत्व याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी अपयशी ठरले आहेत, अशी घणाघाती टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस व प्रवक्ते ड. राहुल मखरे यांनी केली.

इंदापूर रेस्ट हाऊस येथे दिनांक १५ जून २०२५ रोजी आयोजित कार्यकर्ता बैठकीत प्रमुख मार्गदर्शक म्हणून ड. मखरे बोलत होते. यावेळी सुखदेव चव्हाण, बाबासाहेब भोंग, महेश लोंढे, राहुल शिंगाडे, विकास भोसले, सूरज धाईंजे, नानासाहेब चव्हाण, ड. सूरज मखरे, बलभीम महाराज राऊत, नागेश भोसले, दया मखरे, आझाद सय्यद, अल्ताफ मोमीन, इम्रान बागवान, दादा आदलिंग आणि दादा गायकवाड यांच्यासह तालुक्यातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे बोलताना ड. मखरे म्हणाले, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पक्षश्रेष्ठींच्या आदेशांचे पालन करून काम करावे. पक्षश्रेष्ठींना तालुक्याच्या राजकीय, सामाजिक आणि भौगोलिक परिस्थितीची पूर्ण जाणीव आहे. त्यामुळे पक्षाने दिलेल्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करा. पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार करताना कार्यकर्त्यांनी पक्षवाढीसाठी कटिबद्ध राहावे. तुमच्या कामाची दखल घेऊन भविष्यात योग्य संधी दिली जाईल, असे आश्वासनही मखरे यांनी कार्यकर्त्यांना दिले.

# शिवसेनेचे पुणे जिल्हाप्रमुख शरद पवारांच्या व्यासपीठावर; राजकीय चर्चांना उधाण

**खेड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार व ज्येष्ठ नेते शरद पवारांच्या उपस्थितीत आयोजित संकल्प मेळाव्याला शिवसेना पुणे जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर यांनी हजेरी लावली. या घटनेमुळे पुणे जिल्ह्यात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. नगरचे खासदार निलेश लंके यांनी ही भेट घडवून आणल्याचे बोलले जात आहे. पोखरकर यांच्या या उपस्थितीने त्यांच्या राजकीय भूमिकेबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. रविवारी (दि. १५) मुंबईत झालेल्या या कार्यक्रमाला राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, राष्ट्रवादीचे नेते आ. जितेंद्र आव्हाड, खासदार निलेश लंके, मुंबई शहर अध्यक्षा राखीताई जाधव यांच्यासह ३६ तालुके आणि सहा जिल्ह्यांतील कार्यकर्ते उपस्थित होते.